( **सभापतीस्थानी माननीय सभापती** )

अधिवेशनाचा शुभारंभ " वंदे मातरम् " या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी. मु.शी.** : <u>सभागृहाच्या नेत्यासंबंधी घोषणा</u>

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभागृह नेत्याचे पद रिक्त असून महाराष्ट्र विधान परिषद सभागृह नेत्याच्या नियुक्ती संदर्भात मला माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र पाठवून कळविले आहे की, महाराष्ट्र विधान परिषद नियम 2 च्या पोट - नियम जे - 1 मधील तरतुदीनुसार विधान परिषद सभागृहाचे नेते म्हणून माननीय श्री. छगन भुजबळ , उप मुख्यमंत्री यांची नियुक्ती करीत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी पाठविलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र विधान परिषद नियम 56 अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये मी माननीय श्री. छगन भुजबळ , उप मुख्यमंत्री यांना " सभागृहाचे नेते " म्हणून घोषित करीत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/

**पृ.शी./ मु.शी :** उपमुख्यमंत्र्यांचा परिचय

**सभापती** : श्री. छगन चंद्रकांत भुजबळ यांचा उप मुख्यमंत्री म्हणून मी या सभागृहाला परिचय करुन देत आहे. त्याचबरोबर अन्य मंत्र्यांचा त्यांनी परिचय करुन द्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

**पृ.शी. मु.शी .:** मंत्र्यांचा परिचय

श्री.छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय , श्री सुरुपसिंग हि-या नाईक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री अजित अनंतराव पवार यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री हर्षवर्धन शहाजीराव पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री गणेश रामचंद्र नाईक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री दिलीप दत्तात्रय वळसे - पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, हाजी अनिस मजीद अहमद यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे

सभापती महोदय, श्री बाळासाहेब भाऊसाहेब थोरात यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे

यानंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/KTG. श्री. गायकवाड नंतर ---

श्री. छगन भुजबळ ...

सभापती महोदय, डॉ. श्रीमती विमल नंदकिशोर मुंदडा यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. चंद्रकांत दामोदर हंडोरे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. सुनील दत्तात्रय तटकरे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. बबनराव भिकाजी पाचपुते यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. नवाब मलिक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. रविशेठ दगडू पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. राजेश अंकुशराव टोपे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. मदन विश्वनाथ पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. रमेशचंद्र गोपीकिसन बंग यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी राज्यमंत्र्यांचा परिचय करून देतो.

सभापती महोदय, श्री. सुरेश हिरायेन्ना शेट्टी यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

.... बी 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ......

सभापती महोदय, डॉ. सुनील पंजाबराव देशमुख यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. हसन मियाँलाल मुश्रीफ यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, ॲड्. प्रीतमकुमार संपतराव शेगावकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. नितीन काशीनाथ राऊत यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. सुरेश वरपुडकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. विजय वडेट्टिवार यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. सतीश भास्करराव पाटील यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, श्री. नाना जयराम पंचबुद्धे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

सभापती महोदय, डॉ. शोभा दिनेश बच्छाव यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करून देत आहे.

**नव निर्वाचित सदस्यांचा परिचय**

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित श्रीमती मधू रमेश जैन यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे.

.... बी 3 ....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा.

**सभापती** : विधान परिषद नियम 261(2) च्या तरतुदींना अनुसरून मी सभागृहाला असे कळवितो की, या सभागृहातील नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातून निर्वाचित सदस्य श्री. सागर दत्तात्रय मेघे यांनी या सभागृहातील त्यांच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिनांक 26 ऑगस्ट 2008 रोजी मध्यान्हानंतर दिला आहे.

...... बी 4 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई शहरात अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोट व गोळीबारात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान आणि या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल माननीय सभापतींनी मांडलेला शोक प्रस्ताव.

**सभापती** : मी सभागृहासमोर अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर असा प्रस्ताव मांडतो. ..

" बुधवार, दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी रात्रौ 9.30 च्या सुमारास देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरातील ताज हॉटेल, लिओपॉर्ड कॅफे, रिगल सिनेमा, ओबेरॉय हॉटेल, विधान भवन लगतचा परिसर, नरिमन हाऊस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जी.टी.हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, मेट्रो सिनेमा, मरीन ड्राईव्ह, विलेपार्ले, सांताक्रूझ व वाडीबंदर अशा अनेक मोक्याच्या ठिकाणी अतिजहाल अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात व बेछूट गोळीबारात शहीद झालेले दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख सह-पोलीस आयुक्त हेमंत करकरे, अपर पोलीस आयुक्त अशोक कामठे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळसकर व रेल्वेचे पोलीस निरीक्षक शशांक शिंदे, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर संदीप उन्नीकृष्णन् व हवालदार गजेंद्र सिंग, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पांडुरंग मोरे, बापूराव साहेबराव धुरगुडे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नानासाहेब भोसले, तुकाराम गोपाळ ओंबळे, पोलीस कॉन्स्टेबल ए.आर.चिते, .....

( यानंतर श्री. सरफरे .... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

विजय मधुकर खांडेकर, योगेश पाटील, जयवंत पाटील, आंबादास रामचंद्र पवार, रेल्वे पोलीसचे हेड कॉन्स्टेबल मुरलीधर लक्ष्मण चौधरी, एसआरपीएफचे कॉन्स्टेबल राहुल सुभाष शिंदे आणि होमगार्डचे शिपाई मुकेश भिकाजी जाधव हे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवान शहीद झाले. या हल्ल्यात अनेक निरपराध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत. तसेच अनेक व्यक्ती जखमी झ ाल्या आहेत.

साऱ्या जगाने शोक व्यक्त करावा अशी ही दुर्धटना आहे. अतिजहाल अतिरेक्यांनी मानवतेला काळिमा फासणाऱ्या क्रूर व निषेधार्ह अशा केलेल्या या कृत्याने मुंबई महानगर, महाराष्ट्र राज्य व संपूर्ण देश हादरला आहे. या वाढत्या दहशतवादाला प्रतिबंध करण्याचे तसेच दहशतवादाचा नि:पात करण्याचे आव्हान आपल्या देशासमोर उभे आहे. या दुर्घटनेत बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांना सावरण्यासाठी व जखमींना मदत करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच, अशा वेळी सर्वत्र शांतता कशी राहील हे पाहिले पाहिजे. या दहशतवादी कृत्यांचा मी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करुन शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवान यांच्या तसेच या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते असा प्रस्ताव सभागृहाच्या वतीने मांडतो. आणि या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी या सभागृहाच्या नेत्यांना विनंती करतो की, त्यांनी व त्यानंतर सभागृहाचे विरोधी पक्षनेते, गटनेते यांनी एकेक मिनिटामध्ये या प्रस्तावाला अनुमोदन द्यावे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आपण याठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. बुधवार, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील ताज हॉटेल, लिओपॉर्ड कॅफे, रिगल सिनेमा, ओबेरॉय हॉटेल, विधान भवन लगतचा परिसर, नरिमन हाऊस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जी.टी. हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, मेट्रो सिनेमा, मरीन ड्राईव्ह, विलेपार्ले, सांताक्रुझ व वाडीबंदर अशा अनेक ठिकाणी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या बॉम्बस्फोट आणि बेछूट केलेल्या गोळीबारात दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख सह पोलीस आयुक्त हेमंत करकरे, अपर पोलीस आयुक्त अशोक कामठे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळसकर, रेल्वेचे पोलीस निरीक्षक शशांक शिंदे, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर संदीप उन्नीकृष्णन व हवालदार गजेंद्र सिंग, पोलीस उप निरीक्षक प्रकाश पांडुरंग मोरे, बापुराव साहेबराव धुरगूडे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक नानासाहेब भोसले, तुकाराम गोपाळ ओंबळे, पोलीस कॉन्स्टेबल अे. आर. चिते, विजय मधुकर खांडेकर, योगेश पाटील, जयवंत पाटील, आंबादास रामचंद्र पवार, रेल्वे पोलीसचे हेड कॉन्स्टेबल मुरलीधर लक्ष्मण चौधरी, एसआरपीएफचे कॉन्स्टेबल राहुल सुभाष शिंदे आणि होमगार्डचे शिपाई मुकेश भिकाजी जाधव हे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवान, तसेच या हल्ल्यात अनेक निरपराध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या व अनेक जखमी झाले. या देशातील ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. या दहशतवादी हल्ल्याला सडेतोडपणे तोंड देण्यासाठी राज्यातील बहाद्दर पोलीस अधिकारी व कर्मचारी, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर, जवान यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता प्राणाची बाजी लावली. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसमध्ये ज्यावेळी दोन अतिरेकी घुसले आणि त्यांनी बेछूटपणे गोळीबाराला सुरुवात केली. त्यावेळी वेगवेगळया ठिकाणी त्यांनी हल्ले सुरु केले होते हे खरे आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे फार मोठया प्रमाणावर लोक मारले गेले अशी सुरुवातीची बातमी आली.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हे अतिरेकी अतिशय शस्त्रसज्ज, पूर्वनियोजित सगळा प्लॅन करुन आलेले असताना ज्या ज्या ठिकाणी या राज्याचे पोलीस किंवा पोलीस अधिकारी उपस्थित होते त्या सगळयांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. हातामध्ये जे शस्त्र असेल त्यानुसार त्यांचा मुकाबला केला. थोडक्यात सांगावयाचे झाले तर ते धारातीर्थी पडल्यानंतरच हे अतिरेकी पुढे जाऊ शकले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनसमध्ये श्री. शशांक शिंदे आणि त्याचे जे पोलीस होते त्यांनी त्यांच्या साध्या पिस्तूल किंवा रिव्हाल्वरमधून अतिरेक्यांवर हल्ला चढविला. त्यांना कल्पना होती की, बेछूटपणे गोळीबार करणाऱ्या एके 46 आणि इतर शस्त्राने कत्तल होत आहे परंतु त्याची पर्वा न करता पोलीस अधिकारी आणि पोलीस त्याला सामोरे गेले. ते धारातीर्थी पडल्यानंतरच हे अतिरेकी पुढे जाऊ शकले. पुढे कामा हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर सुध्दा श्री. दाते आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. 4 हॅण्ड ग्रेनेडचे स्फोट झाले त्यामध्ये स्वत: श्री. दाते यांना अनेक ठिकाणी जखमा होऊन सुध्दा त्यांनी त्यांना पुढे न जाऊ देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यामध्ये त्यांच्या सहकाऱ्यांचे बलिदान झाल्यानंतर आणि नाईलाज झाल्यानंतरच हे अतिरेकी पुढे गेले. पुढे श्री. हेमंत करकरे, श्री. अशोक कामठे आणि श्री. विजय साळसकर आणि त्यांच्या बरोबर जे शिपाई होते त्यांनीही अडविण्याचा प्रयत्न केला. श्री. अशोक कामठे यांनी फायरींग केली. त्यामध्ये कसाब याच्या हाताला गोळी लागली. परंतु त्यांच्याकडे अतिशय आधुनिक शस्त्रे होती. ज्याला आपण बर्स्ट फायरींग म्हणतो तशी सतत फायरींग केल्यामुळे सगळेच्या सगळे धारातीर्थी पडल्यानंतरच हे अतिरेकी पुढे जाऊ शकले. पुढे आल्यानंतरसुध्दा मेट्रो सिनेमाजवळ उपस्थित असलेल्या पोलिसांनी मुकाबला केला. त्या ठिकाणी सुध्दा एक पोलीस धारातीर्थी पडला आणि पुढे ज्यावेळी त्यांनी पोलिसांची पळवलेली गाडी पंक्चर झाली आणि दुसऱ्या गाडीतून ते गेले त्यावेळी त्या गाडीमध्ये सुदैवाने जिवंत असलेला परंतु दोन्ही खांदे गोळीबाराने निकामी झालेला जो पोलीस शिपाई होता त्याने गाडीतील वायरलेस सेटजवळ पोहचून पोलिसांना खबर दिली. त्यानंतर पुढे ज्यावेळेला दुसऱ्या गाडीतून त्यांनी पलायन केले तेव्हा गिरगाव चौपाटीजवळ पोलिसांनी परत त्यांना अडवले. त्या ठिकाणी श्री. तुकाराम ओंबळे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT

श्री. छगन भुजबळ ......

आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी शौर्याची जी परिसीमा असते ती गाठलेली आहे. पोलिसांच्या हातामध्ये शस्त्र नव्हते. काही पोलिसांच्या हातामध्ये फक्त काठी होती. काही लोकांच्या हातात निश्चितपणे पिस्तूल होते. श्री. तुकाराम ओंबळे यांनी कसाब आणि इतर अतिरेकी बाहेर आल्याबरोबर त्यांची एके 47 धरली आणि स्वत:च्या पोटात गोळ्या झेलल्या. दरम्यानच्या काळात त्यांच्या बाकीच्या सहकाऱ्यांनी हल्ला करुन त्यांना खाली पाडले. आज त्या कसाबमुळेच सगळ्या जगात पाकिस्तानच्या ज्या कारवाया आहेत त्या उघड्या पडलेल्या आहेत. त्यामुळे असे जे असीम शौर्य आहे ते या सगळ्यांनीच दाखविलेले आहे आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये हे नौजवान रणातून पाठीमागे हटलेले नाहीत. तीच गोष्ट जे होमगार्ड होते त्यांचीही झालेली आहे. एनएसजीचे जवान सुध्दा धारातिर्थी पडले. म्हणूनच अध्यक्ष महोदय, या हल्ल्यात बलिदान दिलेल्या भारतमातेच्या सुपुत्रांच्या कर्तबगारीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपल्या देशावर आणि राज्यावर किंवा कोणत्याही शहरावर कोणत्याही प्रकारचा हल्ला कोणी केला तर तो सर्व ताकदीनिशी आपण परतावून लावू शकतो हा सार्थ विश्वास त्यांनी आपल्या बलिदानाने दाखवून दिलेला आहे. म्हणून असे हौतात्म्य पत्करलेल्या, शहीद झालेल्या बहाद्दर पोलीस अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर व जवानांबद्दल तसेच या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तिंबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करीत आहे. त्यांच्या निधनाबद्दल मी आदरांजली अर्पण करतो.

-----

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, आपण मांडलेल्या शोक प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी आणि त्याला अनुमोदन देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बुधवार, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी रात्रौ 9 ते 9.30 च्या सुमारास देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरातील ताज हॉटेल, लिओपॉर्ड कॅफे, रिगल सिनेमा, ओबेरॉय हॉटेल, विधान भवन लगतचा परिसर, नरिमन हाऊस, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जी.टी.हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, मेट्रो सिनेमा, मरीन ड्राईव्ह, विलेपार्ले, सांताक्रुझ व वाडीबंदर अशा अनेक मोक्याच्या ठिकाणी अतिजहाल अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात व बेछूट गोळीबारात शहीद झालेले, दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख सह पोलीस आयुक्त हेमंत करकरे, अपर पोलीस आयुक्त अशोक कामठे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळसकर व रेल्वेचे पोलीस निरीक्षक शशांक शिंदे, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर संदीप उन्नीकृष्णन व हवालदार गजेंद्र सिंग, पोलीस उप निरीक्षक प्रकाश पांडुरंग मोरे, बापुराव साहेबराव धुरगूडे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक नानासाहेब भोसले, तुकाराम गोपाळ ओंबळे, पोलीस कॉन्स्टेबल अे. आर. चिते, विजय मधुकर खांडेकर, योगेश पाटील, जयवंत पाटील, आंबादास रामचंद्र पवार, रेल्वे पोलीसचे हेड कॉन्स्टेबल मुरलीधर लक्ष्मण चौधरी, एसआरपीएफचे कॉन्स्टेबल राहूल सुभाष शिंदे आणि होमगार्डचे शिपाई मुकेश भिकाजी जाधव हे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवान, तसेच या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तींच्या दुःखद निधनाबद्दल हा शोक प्रस्ताव प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो.

सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजीची रात्र खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या नव्हे तर संपूर्ण देशाच्या इतिहासामध्ये अतिशय काळीकुट्ट रात्र म्हणून नोंदली जाईल, अशाप्रकारचे कृत्य त्या रात्री घडले आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि या मुंबईलाच उद्ध्वस्त करण्याचा डाव अतिरेक्यांनी आखला होता. जवळपास 59 तास आपल्या जवानांनी, पोलीस अधिकाऱ्यांनी, सुरक्षा दलाच्या शिपायांनी अतिरेक्यांशी झुंज देऊन हे संपूर्ण नाट्य संपविले. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांनी आपले बलिदान दिले त्याचा महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशा

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

प्रकारची कामगिरी त्यांनी केली आहे. खरे म्हणजे हिंदुस्थानामध्ये विशेषत: महाराष्ट्र राज्यात परंपरा चालत आलेली आहे आणि ही परंपरा आजतागायत या जवानांनी चालू ठेवली आहे, त्याचा महाराष्ट्रातील प्रत्येकाला अभिमान आहे. या शोक प्रस्तावाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला निश्चितपणे आपल्याला चांगला संदेश देता येईल. अशाप्रकारची परंपरा या व्यक्तिंनी या देशामध्ये जोपासली आहे. त्यामुळे भविष्यात महाराष्ट्रावर व देशावर अशाप्रकारचे संकट आले तर या देशातील प्रत्येक नागरिक या परंपरेची आठवण ठेवून देशाच्या स्वाभिमानासाठी, अखंडतेसाठी आणि देशाच्या अस्तित्वासाठी या लढाईमध्ये साथ देईल. प्रत्येक नागरिकाला या बलिदानाची परंपरा जोपासावी लागेल असा आदर्श आपल्या या जवानांनी घालून दिला आहे. त्याचा प्रत्येक माणसाला निश्चितपणे अभिमान आहे. या हल्ल्यात अतिरेक्यांनी जे कृत्य केले आहे त्याचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे. या हल्ल्याचा मी तीव्र शब्दामध्ये निषेध करतो आणि हा हल्ला परतवण्यासाठी तब्बल 59 तास ज्या बहाद्दरांनी झुंज देऊन आपले बलिदान दिले त्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मी आदरांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय विधिमंडळाच्या कारकीर्दीमध्ये प्रथमत:च अशा प्रकारचा प्रस्ताव या सर्वोच्च सभागृहामध्ये मांडून सर्व सभागृहाच्या भावना आपण व्यक्त केल्या त्याबद्दल मी आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

26 नोव्हेंबर 2008 रोजीचा दहशतवाद्यांचा हल्ला आणि त्यासंबंधीची चर्चा सबंध देशभर सुरु आहे. कुठे कुठे काय काय झाले, कसे झाले यासंबंधीचा उल्लेख आपण केलेला आहे. दहशतवाद्यांच्या बेछूट गोळीबारात दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख सह पोलीस आयुक्त हेमंत करकरे, अपर पोलीस आयुक्त अशोक कामटे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजय साळसकर, रेल्वे पोलीस निरीक्षक शशांक शिंदे, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे मेजर संदीप उन्नीकृष्णन व हवालदार गजेंद्र सिंग, पोलीस उप निरीक्षक प्रकाश पांडुरंग मोरे, बापुराव साहेबराव धुरगूडे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक नानासाहेब भोसले, तुकाराम गोपाळ ओंबळे, पोलीस कॉन्स्टेबल अे.आर.चिते, विजय मधुकर खांडेकर,योगेश पाटील, जयवंत पाटील, आंबादास रामचंद्र पवार, रेल्वे पोलीसचे हेड कॉन्स्टेबल मुरलीधर लक्ष्मण चौधरी, एसआरपीएफचे कॉन्स्टेबल राहुल सुभाष शिंदे आणि होमगार्डचे शिपाई मुकेश भिकाजी जाधव हे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी व कर्मचारी जवान शहीद झाले. हा दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी 17-18 भारतीय जवान आणि पोलिसांना बलिदान द्यावे लागले. तसेच दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात अनेक निरपराध नागरिक मृत्यूमुखी पडले. या सर्वांना मी आदरांजली वाहत असतानाच जे शहीद झाले त्यांच्या शौर्याबद्दल जेवढ्या ओतप्रोत भावना व्यक्त कराव्यात तेवढया त्या थोड्याच आहेत. कारण शौर्यालाही अभिमान वाटेल असे काम तुकाराम गोपाळ ओंबळे याने केलेले आहे. दहशतवाद्यांची एके-47 हे त्याच्या शरीरामध्ये रिकामी होत असतानाही त्याने ती सोडली नाही, ती तशीच धरुन ठेवली. त्याच्या या अतुलनीय शौर्यामुळेच एक अतिरेकी जीवंत पकडता आला. अतिरेक्यांना कंठस्नान घालणे हे तर शौर्य आहेच. परंतु अतिरेक्याच्या एके-47मधून गोळयांचा वर्षाव होत असतानाही ती बंदूक तशीच धरुन त्या अतिरेक्याला जिवंत पकडून देताना जे बलिदान दिले ते सर्वश्रेष्ठ बलिदान आहे अशा भावना मी व्यक्त करतो. म्हणून शौर्यालाही अभिवान वाटवा अशा प्रकारच्या कर्तृत्ववान व्यक्ती मुंबई शहरातील या पोलीस दलामध्ये आणि या देशामध्ये आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते।.)

माननीय सभापती महोदय, या शोकप्रस्तावाच्या संदर्भात आपण आणि या सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या भावनांशी मी सहमत असताना एक गोष्ट नमूद करु इच्छितो की, व्यर्थ न हो बिलिदान असे म्हणण्याची वेळ आपल्यावर वारंवार येत आहे. अशा प्रकारच्या अतिरेकी हल्ल्यात आणि कारवायांमध्ये हकनाक मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या बद्दल या सभागृहामध्ये शोकप्रस्ताव मांडणे ही नित्याची बाब झालेली आहे. म्हणून आज या शहिदांना आदरांजली वाहत असताना भविष्यामध्ये आपण सर्वजण सर्तक होण्याचा निर्धार केला तर ती त्यांना ख-या अर्थाने आदरांजली ठरेल असे मला वाटते. सभापती महोदय, जेव्हा हा हल्ला चालू होता त्यावेळी सन्माननीय माजी गृहमंत्री श्री. आबासाहेब पाटील यांनी टी.व्ही.वर बोलताना जे एक वाक्य उच्चारले ते मला खूप भावले. ते म्हणाले, "हा ताज हॉटेलवरचा हल्ला नाही, ओबेराय हॉटेल हल्ला नाही, नरीमन हाऊसवरचा हल्ला नाही तर हा देशावरचा हल्ला आहे." हा देशावरचा हल्ला आहे हे देशाने स्वीकारलेले आहे. या हल्ल्याच्या संदर्भात देशाच्या सार्वभौम सभागृहामध्ये, लोकसभेमध्ये चर्चा झ ाली आणि वयं पंचादिकम् शतम् या अर्थाने शहिदांना आदरांजली वाहिली. 26 नोव्हेंबर रोजी मुंबईमध्ये झालेला हल्ला हा देशावरचा हल्ला आहे. म्हणून देशातील सर्व विधिमंडळामध्ये अशा प्रकारचा शोक प्रस्ताव मांडला गेला तर त्या त्या राज्यातील सर्व नागरिकांमध्ये या हल्ल्याच्या संदर्भातील भावना तीव्र होतील आणि मुंबईतील हल्ल्यामध्ये जे शहीद झालेले आहेत त्याप्रमाणे भविष्यामध्येही वीरगती प्राप्त करणारे नरवीर निर्माण होतील अशी माझी भावना आहे.

..नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

या दु:खद ठरावाच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या भावनांशी मी सहमत आहे आणि या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, कर्मचारी व जवान तसेच अनेक निरापराध व्यक्तीबाबत मी आदरांजली व्यक्त करतो. आपल्यावर पुन्हा अशा प्रकारची परिस्थिती येऊ नये अशा प्रकारची भावना देखील या निमित्ताने व्यक्त करतो आणि यासंबंधीचे माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, आज सभागृहासमोर जो शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्याला सहमती दर्शविण्यासाठी मी उभा आहे. जगाने अनेक युध्दे पाहिलेली आहेत. विधिमय सत्ता ज्यावेळेला विधिमय सत्तेशी संघर्ष करते त्यातून युध्द पुढे येते. या युध्दाचे परिणाम आपण जसजसे मागे जाऊ तसतसे आपणाला ते कमी दिसतात. त्या काळामध्ये महाभारत म्हणून ज्याचा उल्लेख केला, त्यामध्ये जो संहार झाला, त्यापेक्षा किती जास्त संहार पुढेपुढे मुख्यत्वे अंतर्ज्ञानाचा विकास आणि जग लहान होणे, दळणवळणाच्या साधनसामुग्रीमध्ये सर्व स्तरावर झालेला विकास यामुळे मानवी समुहासमोर जी स्थिती आज उभी झाली आहे, त्याचे दर्शन या प्रकारातून घडलेले आहे हे खूप मोठया प्रमाणात मानवी समुहाने लक्षात घेणे गरजेचे आहे. आधुनिक साधनसामुग्रीमुळे अनेक युध्द बाजूला पडून मागच्या शतकामध्ये झालेल्या पहिल्या आणि दुस-या महायुध्दाला पहिले आणि दुसरे महायुध्द असे संबोधले गेले. पण विधिमय सत्तेने विधिमय सत्तेशी लढणे हे वेगळे आणि विधिमयरित्या शांततामय जीवन जगणा-या एखाद्या समुहावर अतिरेकी कारवायांनी भारलेल्या दुस-या एखाद्या बेकायदा मानवी समुदायाने अशा प्रकारचा भ्याड हल्ला करणे हे वेगळे. अमेरिकेतील पेन्टॅगॉनवर झालेल्या हल्ल्यानंतर अशा प्रकारचे दुसरे किंवा तिसरे हे उदाहरण आहे. संसदेवर जो हल्ला झाला त्याला दुसरे उदाहरण म्हटले तर या घटनेस तिसरे उदाहरण म्हणता येईल. पूर्वीच्या घटनेपेक्षा अतिशय भयानक हल्ला असे म्हटले तर या घटनेस दुसरे उदाहरण म्हणता येईल. असे भयानक उदाहरण आपल्यासमोर आलेले आहे. पहिली गोष्ट अशी की, जग हे लहान झालेले आहे, दुसरी गोष्ट म्हणजे दळणवळणाची साधने सर्व स्तरावर मोठया प्रमाणात वाढलेली आहेत, तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे इतक्या सुसज्ज साधन सामुग्रीसह शिरणारे हे अतिरेकी पृथ्वीवरील पाठीवर असलेल्या कोणत्या तरी विधिमय सत्तेचे पाठबळ असल्याशिवाय एवढया साधनसामुग्रीसह हा प्रकार करु शकत नाहीत. त्या विधिमय सत्तेने उपलब्ध करुन दिलेल्या हत्यारांचा आणि शस्त्र समुहाचा अतिरेक्यांनी वापर केला. विधिमय सत्तेने अशा प्रकारे हत्यारे आणि शस्त्रे उपलब्ध करुन दिली व त्याची प्रत वाढत गेली तर त्यापासून आपल्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अण्वस्त्रांचा वापर दुस-या महायुध्दामध्ये झाला, परंतु तो होत असताना एका विधिमय सत्तेने दुस-या विधिमय सत्तेवर अशा अण्वस्त्रांचा एकदा वापर केला आणि त्याचा जो बोध घेतला गेला त्यामुळे अण्वस्त्रांचा वापर

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख ..........

करण्याची कोणाची हिंमत होत नाही. हा विषय मी मुद्दाम एवढयासाठी मांडला आहे की, या प्रकारात जे बलिदान झाले आहे, या बलिदानाने या चार मुद्यांचा बोध आजच्या काळामध्ये वास्तव्य करणा-या मानवी समुहाने घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे मत व्यक्त केले ते खरे आहे की, देशाच्या पातळीवर या घटनेची नोंद घेतली गेलेली आहे. एके-47 पेक्षा अत्याधुनिक शस्त्रे दहशतवाद्यांकडे होती. राज्यातील बहादूर पोलिसांनी, एनएसजी यांनी या अतिरेक्यासमवेत लढा दिला. या हल्ल्यात आपल्या व आपल्या राज्याच्या आणि देशाच्या रक्षणासाठी अशा प्रकारचे शौर्य गाजविणाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्याची वेळ आज आपल्यावर आली आहे. सभागृहाच्या नेत्यांनी ज्या भावना याबाबत व्यक्त केल्या त्या भावनांशी मी सहमती व्यक्त करतो आणि हा जो हल्ला करण्यात आला त्यात कदाचित त्यातील एखादी व्यक्ती जिवंत असेल, परंतु अनेक व्यक्ती मृत्यूमुखी झाल्या आहेत. अशा प्रकारच्या कृत्यांना कोणत्याही विधिमय अशा सत्तेने शांततामय अशा समुहाने थारा देणे ही गोष्ट अतिशय निषेधार्ह आहे. मी या गोष्टीचा निषेध करतो आणि या ठरावाला पाठिंबा देऊन मी माझे मनोगत पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : माननीय सभापती महोदय, आपण मांडलेल्या शोक प्रस्तावावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी आणि माणुसकीच्या शत्रुंच्या विरोधात लढताना ज्यांनी आपले प्राणार्पण केले त्या सर्व शहीदांना अभिवादन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आदरणीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याप्रमाणे एक वेगळया प्रकारचे युध्द आपल्यावर पहिल्यांदा लादले गेले. आपण एरव्ही पोलिसांना दूषण देतो. पण पोलीस असल्या नसल्या शस्त्रानिशी ज्या पध्दतीने लढले, सभागृहाच्या नेत्यांनी तुकाराम ओंबळे यांच्या शौर्याचे जे वर्णन केले ते योग्यच आहे. या शौर्याची परिसीमा आपल्या सर्वच जवानांनी गाठली होती. या वीरांचे उच्चस्मरण यापुढच्या काळात ठेवायचे असेल तर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटले ते अधिक महत्वाचे आहे. आपण सारेजण यापासून धडा घेणार आहोत की नाही? आपण काही निर्धार करणार आहोत की नाही? जी परिस्थिती आपल्यावर लादण्यात आली त्या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी आपल्यातील सर्व भेद, जाती, प्रांत, भाषा, धर्म आणि पक्षभेद बाजूला सारुन आपल्याला एकजुटीने याविरुध्द उभे रहावे लागेल. थोडा जरी विसंवाद दिसला, वेगळा सूर दिसला तर ज्या शक्ती आपल्यावर चालून आल्या त्या पुढच्या काळात अधिक आक्रमक होतील अशी भीती आहे. म्हणून सारे मतभेद बाजूला सारुन साऱ्या देशाने एकत्र येण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशातील सार्वभौम सभागृहात म्हणजे संसदेत त्याचे दर्शन माननीय पंतप्रधानांपासून विरोधी पक्षनेत्यांपर्यंत सर्वांनी एकजुटीने दाखवून दिले. तीच भूमिका आज या सभागृहामध्ये व्यक्त होत आहे. या वीर शहीदांचा उचित सन्मान करण्याचे काम राज्य शासनाकडून केले जाईल यात शंका नाही. परंतु शहीद हेमंत करकरे आणि त्यांचे सहकारी, एन.एस.जी.चे जवान आणि तुकाराम ओंबळेसारखे पोलीस यांनी जे बलिदान केले त्याची यापुढच्या काळात आपल्याला सातत्याने आठवण ठेवावी लागेल. शहीद हेमंत करकरे यांच्याबद्दल अत्यंत वाईट उद्गार काढले गेले होते. त्यांना व्हिलन ठरवले गेले. त्यांच्या बायको-मुलांची धिंड काढण्याची भाषा व्यक्त केली गेली. आज त्याबद्दल चर्चा करण्याची वेळ नाही. परंतु या निमित्ताने या वीरांना अभिवादन करताना आमची चूक झाली एवढे कोणीतरी म्हणावे ही अपेक्षा आहे......(अडथळा).............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या पक्षाचे नेते आहेत? असे ठरले होते की, फक्त आदरांजली व्यक्त करायची.

श्री.दिवाकर रावते : सभागृहात मांडलेल्या शोक प्रस्तावाचे गांभीर्य घालवायचे नसेल तर सन्माननीय सदस्यांना बाहेर घालवून द्या.

**सभापती** : सदनामध्ये जे गटनेते आहेत त्यांनाच मी बोलायला संधी दिली आहे. सन्माननीय सदस्यांची वन मॅन पार्टी आहे. त्या पार्टीचे ते नेते आहेत.

श्री.विनोद तावडे : पार्टी नोंदलेली नाही.

**सभापती** : माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार वन मॅन पार्टी यादृष्टीने मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना यापूर्वीही बोलण्याची संधी दिली होती आणि आजही दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या पध्दतीचे वक्तव्य केले आहे ते मी तपासून घेतो. त्यात जे काही चुकीचे असेल किंवा गैरलागू असेल ते मी काढून टाकेन.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सार्वभौम सभागृहामध्ये प्रत्येक सन्माननीय सदस्याला आपले विचार सद्सद्विवेक बुध्दीने मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा कायदेशीर उपयोग करुन सन्माननीय सदस्यांनी काही घटनांचा उल्लेख करुन आपले विचार मांडले असतील तर ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढणे म्हणजे या सार्वभौम सभागृहाचा अवमान आहे. सन्माननीय सदस्यांनी जे विचार मांडले त्या विचारांबद्दल आक्षेप घेता येऊ शकतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आदरांजली वाहत असताना त्या आदरांजलीला साजेल असे वक्तव्य सन्माननीय सदस्यांनी करावे अशी अपेक्षा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी कृपया खाली बसावे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुमंत गायकवाड हे आपले विचार मांडतील.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहात आपण जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईत जो प्रकार घडला, वास्तविक त्याचे विश्लेषण मी करण्याची आवश्यकता नाही परंतु सर्वसाधारण जनतेमध्ये या हल्ल्यामुळे घबराट निर्माण व्हावी असाच हा प्रयत्न होता. परदेशातून येणारे लोक पर्यटनासाठी मुंबई शहरात येऊ नयेत हाच उद्देश त्यापाठीमागे होता असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. तसेच या हल्लेखोरांपैकी जो एक हल्लेखोर पकडला त्याने देखील काही सांगितलेले नाही. परंतु ज्या ठिकाणी हमला झालेला आहे त्या मुंबई शहरात विविध जाती, धर्म व प्रांताचे लोक एकत्र राहतात, त्याच नगरातील छत्रपती शिवाजी टर्मिनस स्थानकावर अशा प्रकारचा हल्ला होणे ही अत्यंत खेदजनक बाब आहे. या घटनेचा संपूर्ण सभागृहाने निषेध केला पाहिजे. त्याचप्रमाणे असे जे प्रकार होत आहेत त्यात आपले पोलीस दल, कमांडोज, एनएसजीचे लोक या सर्वांनी जे शौर्य दाखविले आणि हौतात्म्य पत्करले त्या सर्वांना आपण श्रध्दांजली तर वाहिलीच पाहिजे परंतु अशा सर्व घटनांमधून आपण बोधही घेतला पाहिजे. केवळ आपापसात तंटे वा मतभेद निर्माण करुन काहीच होणार नाही, त्यामुळे देशाचे नुकसानच होईल. हे सर्व विसरुन अशा प्रसंगी तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे. शेवटी या सर्व शहीदांना मी माझ्या रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आदरांजली वाहतो आणि माझे भाषण संपवितो.

---------------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ SBT/

**सभापती** : सभागृहाच्या वतीने अत्यंत गंभीर अशा पध्दतीचा जो शोक प्रस्ताव मी मांडला आहे त्यावर सभागृहात माननीय गटनेत्यांनी आपापले विचार व्यक्त केले. आपले जवान, महाराष्ट्र पोलीस दल आणि अधिकारी तसेच एनएसजीचे जवान यांनी या घटनेच्या वेळी अतुलनीय पराक्रम केला, साक्षात मृत्युला कवटाळले, हौतात्म्य पत्करले. आपल्या देशावर होऊ पाहणारा एक दहशतवादी हल्ला आपल्या राज्यावर, मुंबईवर झाला, या हल्ल्यामध्ये सुमारे 200 निरपराध नागरिक सुध्दा दुर्देवाने शहीद झालेले आहेत. एक प्रकारे महाराष्ट्र किंवा संपूर्ण देशाला हादरविणारीच ही घटना आहे. म्हणून या घटनेचा फक्त निषेधच करुन चालणार नाही तर अत्यंत कणखरतेने या प्रवृत्तीला निःपात करण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी तयार राहणे गरजेचे आहे. सुदेवाने देश पातळीवर आपल्या लोकसभेमध्ये ज्या पध्दतीने या अत्यंत गंभीर घटनेच्या अनुषंगाने सर्वांचे एकमत झाले त्याच पध्दतीने विधानपरिषदेत सुध्दा हा ठराव एकमताने पास करु या. महाराष्ट्र पोलीस दलाची तुलना आपण अनेक वेळा स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांबरोबर करतो. त्या पोलीस दलातील मग ते दाते असतील, अशा अनेक पोलिसांनी व अधिकाऱ्यांनी मृत्युला कवटाळले. त्यात श्री. दाते यांनी अत्यंत जिद्दीने, अंगावर जबरदस्त जखमा झालेला असताना देखील ही परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने या हल्ल्यात ते वाचले. स्व. हेमंत करकरे, श्री. कामटे व अन्य पोलीस अधिकारी, मेजर उन्नीकृष्णन् किंवा इतर पोलीस कर्मचारी, एनएसजीचे जवान................

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

यांनी देखील या घटनेच्या वेळी जबरदस्त जिद्दीने या दहशतवाद्यांचा मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच 60 तासानंतर आपण 9 दहशतवाद्यांचा खातमा करु शकलो व एक दहशतवाद्याला जिवंत पकडू शकलो. सहाय्यक पोलीस उप निरीक्षक कै. तुकाराम गोपाळ ओंबळे या विराने ख-या अर्थाने हौतात्म्य पत्करून दहशतवाद्याची ए.के. 47 मशिनगन हातामध्ये पकडली, त्याच्या छातीत,पोटात अनेक गोळया गेल्या असतांना सुध्दा त्यांनी दहशतवाद्याला सोडले नाही. या सर्व प्रकारामुळे आपण जगापुढे हे सिध्द करु शकतो की, या हल्ल्याच्या पाठीमागे नेमके कोण आहे ? दहशतवाद कृतीने सिध्द करण्याच्या दृष्टीने एका जिवंत दहशतवाद्याला आपण कै. तुकाराम गोपाळ ओंबळे यांच्यामुळेच पकडू शकलो आहोत. या निमित्ताने महाराष्ट्रातील आम जनतेला माझी विनंती राहणार आहे की, अशा प्रकारच्या भ्याड हल्ल्यांना तोंड देण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी निर्धार पुर्वक उभे राहणे गरजेचे आहे. या हल्ल्यामध्ये जे शहीद झाले त्या शहिदांच्या कुटुंबियांच्या पाठीशी शासनाने आणि आपण सर्वांनी एक दिलाने उभे राहण्याची गरज आहे. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, देशपातळीवर आणि महाराष्ट्रामध्ये अशा पध्दतीच्या दहशतवादी हल्ल्यांचा मुकाबला करण्याकरिता तुम्ही आम्ही सातत्याने सतर्क व जागरुक राहणे हे आपले सर्वांचे महत्वाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. हे कर्तव्य आपण निश्चित पार पाडू अशी मला या निमित्ताने खात्री आहे.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवण्यात येईल.

---------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला नम्रतापूर्वक विनंती आहे की, आपण या शोक प्रस्तावाला सर्वांनी मिळून श्रध्दांजली वाहिलेली आहे. या प्रस्तावात कोणतेही राजकारण न करता उत्तमरित्या हा शोक प्रस्ताव पास केलेला आहे असा मेसेज संपूर्ण महाराष्ट्रभर गेला पाहिजे. परंतु मघाशी सभागृहात जे वक्तव्य करण्यात आलेले आहे ते पाहून त्यामध्ये जो राजकीय भाग आलेला आहे तो कामकाजातून काढून टाकला तर उद्याच्या वर्तमान पत्रात या वक्तव्याच्या संदर्भात छापले जाणार नाही. नाही तर सध्या जो डिव्हाइडर हाऊसचा मेसेज सातत्याने चालला आहे तसाच हा मेसेज देखील जाईल. त्यामुळे यांसदर्भात प्रोसिडींग वाचून त्यानंतर आपण घोषणा केली तर बरे होईल.

**सभापती** : आपण सर्वांनी शोकप्रस्ताव एकमताने पारीत केलेला आहे. या निमित्ताने आपण विचार मांडत असतांना ज्या पध्दतीचे वक्तव्य झाले असेल तर ते मी लागलीच तपासून घेऊन सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी ते वक्तव्य मी सभागृहाच्या पटलावरुन काढून टाकण्याची व्यवस्था करेन.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज देशामध्ये आणि राज्यामध्ये दहशतवादाच्या संदर्भात स्पष्ट विचार मांडले जात आहेत.

श्री. कपिल पाटील : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जे विचार मांडलेले आहे त्याला मी सहमत आहे. हा शोक प्रस्ताव आपण एक दिलानेच समंत केलेला आहे.

**सभापती** : आपण जे शब्द उच्चारलेले आहेत ते शब्द आपण मागे घ्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी बेकायेदेशीर किंवा संसदीय कामकाजाला लाजवणारे असे काहीही शब्द उच्चारले नाहीत किंवा राजकीय भाष्य सुध्दा या ठिकाणी केलेले नाही. कोणत्याही राजकीय व्यक्तीबद्दल मी काही बोलावे असा काही देखील विचार माझ्या मनात नव्हता त्यामुळे कृपा करुन सन्माननीय सदस्यांनी माझे शब्द अंगाला लावून घेऊ नये कारण ते माझे चांगले मित्र आहेत, मी त्यांचा आदर करतो. सन्माननीय सदस्यांनी माझे शब्द अंगाला लावून घेऊ नये एवढेच माझे म्हणणे आहे.

यानंतर श्री. अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

ते माझे मित्र आहेत. मी त्यांचा आदर करतो. त्यांनी माझे शब्द अंगाला लावून घेऊ नये.

**सभापती** :माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव पारीत होण्याअगोदर या संदर्भात जो निर्णय द्यावा लागेल तो मी देईन. सभागृहाच्या कामकाजातून जे शब्द काढणे आवश्यक आहेत ते मी नक्की काढीन.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण शब्द तपासून घ्यावेत.

**सभापती** : मी ते शब्द तपासून घेतो. तरी सुध्दा माझी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना विनंती आहे की, आज ज्या गांभीर्याचे वातावरण आहे ते पाहता आपण मोठ्या मनाने ते शब्द मागे घ्यावेत.

श्री.कपिल पाटील : अध्यक्ष महाराज, या सभागृहात आल्यानंतर आपण लोकांना बांधलेलो असतो. लोकांच्या प्रक्षोभाला बांधलेलो असतो. आपण जर आपल्या भावना अशाच पध्दतीने स्वत:च बांधल्या तर माझा नाईलाज आहे. तेव्हा आपण मला माफ करावे. मी माझे शब्द मागे धेणार नाही.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्री.विश्वनाथ प्रताप सिंह, भारताचे माजी पंतप्रधान, श्री.सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उप सभापती, विधानपरिषद, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महमद इसाक जमखानावाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.छगन भुजबळ ( उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.विश्वनाथ प्रताप सिंह, भारताचे माजी पंतप्रधान, श्री.सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उप सभापती, विधानपरिषद, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महमद इसाक जमखानावाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो.

"श्री.विश्वनाथ प्रताप सिंह, भारताचे माजी पंतप्रधान, श्री.सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उप सभापती, विधानपरिषद, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महमद इसाक जमखानावाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै.विश्वनाथ प्रताप सिंह, माजी पंतप्रधान यांचा जन्म 25 जून, 1931 रोजी उत्तर प्रदेशातील इलाहाबाद जिल्ह्यात दइया येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., बी.एस्सी, एलएल.बी.पर्यंत झाले होते.

राजघराण्यात जन्माला आलेल्या विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या सामाजिक जीवनाची सुरवात नेहरुजींच्या सहवासातून झाली. त्यांनी 1957 मध्ये विनोबाजींच्या भूदान चळवळीत भाग घेऊन आपली सारी जमीन दान देऊन आपले नाते राजघराण्याशी न ठेवता गरिबांशी, तत्वाशी आणि व्यापक समाजहिताशी असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कार्य केले होते.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.......

कै.व्ही.पी.सिंह यांनी उत्तर प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे सदस्य, जन मोर्चाचे संस्थापक, जनता दलाचे अध्यक्ष, राष्ट्रीय मोर्चाचे संयोजक म्हणूनही कार्य केले होते.

कै.व्ही.पी.सिंह यांनी 1980 मध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असताना चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरी व गुन्हेगारी विरुध्द विशेष मोहीम राबविली त्यात काही कुविख्यात दरोडेखोरांनी आत्मसर्मपण केले होते. त्यामुळे कठोर निर्णय घेणारा धाडसी नेता अशी देशभर त्यांची ओळख झाली होती.

कै.व्ही.पी.सिंह हे देशहितासाठी कुठलाही आडपडदा न ठेवता स्पष्ट बोलणारे नेते होते. राजकारणातील सामाजिक न्यायाची भूमिका त्यांनी अखेरपर्यंत सोडली नाही. सामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यासाठी ते आयुष्यभर झटले. त्यामुळे गरीब शोषितांच्या हक्काखातर सामाजिक परिवर्तनासाठी लढताना सत्तेची पर्वा न करणारे नेते अशी त्यांची ओळख झाली होती. त्यांनी सन 1989 मध्ये देशात आघाडी सरकार स्थापन केले व ते देशाचे पंतप्रधान झाले. त्यावेळी केंद्र शासनाने देशातील इतर मागासवर्ग जातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक बाबींच्या संदर्भात बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची महत्वपूर्ण घोषणा दिनांक 13 ऑगस्ट, 1990 रोजी केल्यानंतर देशातील राजकारणाला नवी कलाटणी मिळाली. इतर मागासवर्गियांना मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार आरक्षण लागू करुन सामाजिक न्यायाचे अखेरपर्यंत त्यांनी समर्थन केले. त्यामुळे "मंडल मसीहा" म्हणून ते चिरंतर सर्वांच्या लक्षात राहतील.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ ..

महात्मा फुले यांच्या पुण्यातील निवासस्थानाला भेट देणारे ते पहिले माजी पंतप्रधान होते. त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात महात्मा फुले यांच्यासंबंधी पुढील प्रमाणे गौरवोद्‌गार काढले होते. "महात्मा फुले भारत के बुनियादी क्रान्ति के पहले महापुरूष थे, इसलिए वे आद्य महात्मा बुद्ध, महावीर, मार्टिन ल्युथर किंग, नानक आदि के उत्तराधिकारी थे. उनका यह समर्पित जीवन आज के युग का प्रेरणा स्त्रोत बना है"

कै. व्ही.पी.सिंह यांना "मंडा का राजा ", "एक प्रामाणिक नेता" म्हणूनही ओळखले जात होते. त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नसतांनाही त्यांच्या कणखर बाण्यामुळे त्यांनी आयुष्यभर सामाजिक कार्य केले. देशभर फिरुन गोरगरीबांच्या लढयांना पाठिंबा देत राहिले. माणगावातील शेतकरी लढयात तसेच मुंबईतील झोपडपट्टीवासियांच्या मोर्चातही ते सहभागी झाले.

कै. व्ही.पी.सिंह हे ज्येष्ठ राजकीय नेते तर होतेच पण त्याबरोबरच एक चित्रकार व कवी म्हणूनही प्रसिध्द होते.

कै. व्ही.पी.सिंह हे 1967 ते 1981 असे दोन वेळा उत्तर प्रदेश विधानसभेवर तर 1980 मध्ये उत्तर प्रदेश विधान परिषदेवरही निर्वाचित झाले हेते. तसेच 1971, 1980 व 1988 असे तीन वेळा लोकसभेवर तर 1983 मध्ये राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते.

कै.व्ही.पी.सिंह यांनी 1974 ते 1976 मध्ये केन्द्रीय वाणिज्य खात्याचे उप मंत्री, 1976-1977 मध्ये राज्यमंत्री, 1980-1982 उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, 1983 ते 1987 मध्ये उद्योग , वाणिज्य, वित्त व संरक्षण खात्याचे केन्द्रीय मंत्री तर 1989 -1990 मध्ये त्यांनी भारताचे पंतप्रधान पदही भूषविले होते.

अशा या प्रामाणिक व अभ्यासू,ध्येयवादी ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 27 नोव्हेंबर 2008 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. सूर्यभान रघुनाथ वहाडणे, यांचा जन्म 5 मार्च 1930 रोजी अहमदनगर जिल्हयात कोपरगाव तालुक्यातील पुणतांबे येथे झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यत झाले होते.

कै. वहाडणे यांनी सुरुवातीला काही काळ कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नोकरी केली होती. सन 1963 मध्ये संघ स्वयंसेवक म्हणून कार्यास सुरुवात करुन त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संघाच्या अनेक जबाबदा-या पार पाडल्या होत्या. काही काळ त्यांनी जनसंघातही संघटक व प्रदेश सरचिटणीस म्हणून कार्य केले होते. तसेच आणीबाणीच्या काळात त्यांना तुरुंगवासही झाला होता.

कै. वहाडणे यांनी गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, खंडकरी, ऊस तोड कामगारांना संघटित करुन त्यांच्या प्रश्नासाठी अनेक आंदोलने केली. भारतीय जनता पक्षाच्या शेतकरी - शेतमजूर आघांडीचे सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे चिटणीस, उपाध्यक्ष तसेच अध्यक्ष म्हणूनही त्यांनी भरीव कार्य केले होते.

कै. वहाडणे 1982 ते 1988 असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. 1988 ते 1944 या काळात त्यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती पद भूषविले होते. 1996 मध्ये ते राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक 2 नोव्हेंबर 2008 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. त्रिबकराव गोपाळराव देशमुख यांचा जन्म 12 ऑगस्ट 1927 रोजी यवतमाळ जिल्हयात पुसद तालुक्यातील विडूळ येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., डी.जे. पर्यत झाले होते.

कै. देशमुख यांनी सन 1953- 72 या काळात साप्ताहिक " मराठी जग ", "दैनिक मातृभूमि" व "महाराष्ट्र टाईम्स" या दैनिकांचे संपादक म्हणून काम केले. त्यांना साहित्याचीही अभिरुची होते. त्यांचे "स्वतंत्र विदर्भ" , "चौदावे रत्न " व "फुलोरा" हे लेख संग्रह प्रसिध्द आहेत.

कै. देशमुख यांनी नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, नाग विदर्भ समितीचे सरचिटणीस, माथाडी हमाल संघटनेचे अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष, राज्य परिवहन महामंडळ, राज्य शासकीय भाषा समिती, मुंबई, राज्य लोकसाहित्य समिती ,पुणे व नागपूर विद्यापीठ सिनेटचे सदस्य तसेच महाराष्ट्र गृह निर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा ) चे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. सन 2000 मध्ये उमरखेड येथील विदर्भ साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष पदही त्यांनी भूषविले होते.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कै. देशमुख हे बापूजी अणे यांच्या प्रभावामुळे विदर्भवादी चळवळ्ीकडे ओढले गेले. त्यांनी नागविदर्भ आदोंलन सामितीच्या बॅनरखाली स्वतंत्र विदर्भासाठी अनेक आंदोलने केली त्यात त्यांना तुरुंगवासही झाला होता. त्यांना विदर्भवादी नेते, स्वतंत्र विदर्भ चळवळीचे कट्टर पुरस्कर्ते, उत्तम वक्ते,चतुरस्त्र लेखक मराठीचे गाढे अभ्यासक व निर्भिड पत्रकार म्हणून ओळखले जात होते.

कै. देशमुख हे सन 1963-64 मध्ये नागपूर महानगरपालिकेचे महापौर होते त्यावेळी त्यांनी अखिल भारतीय महापौर परिषदेचे उपाध्यक्ष पदही भूषविले होते.

कै. देशमुख हे सन 1968 मध्ये राज्यसभेवर निर्वाचित झाले होते. तसेच सन 1980 मध्ये उमरखेड मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1988 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम, माहिती व जनसंपर्क, अन्न व नागरी पुरवठा खात्याचे राज्यमंत्री म्हणूनही काम केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे गुरुवार, दिनांक 4 डिसेंबर 2008 रोजी दुःखद निधन झाले.

या नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

सभापती महोदय, मरहूम महम्मद इसाक जमखानावाला यांचा जन्म 4 जानेवारी, 1930 रोजी बेळगांव येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस. पर्यंत झाले होते. मरहूम जमखानावाला यांनी सुरूवातीस काही काळ वैद्यकीय व्यवसाय केला. मुंबईतील तिब्बिया कॉलेज, हॉस्पिटल बोर्ड व अंजुमन-ए-इस्लाम शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दू अकॅडेमीचे चेअरमन, हाज कमिटी ऑफ इंडिचे उपाध्यक्ष तसेच हिंदुस्थानी प्रचार सभेचे खजिनदार म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध होता.

मरहूम जमखानवाला 1978द मध्ये नागपाडा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर 1988 मध्ये विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. ऑगस्ट 1978 ते फेब्रुवारी 1980 या कालावधीत राज्याच्या मंत्रिमंडळात अर्थ, कामगार, गृहनिर्माण, औकाफ व राजशिष्टाचार खात्याचे राज्यमंत्री तसेच जून 1988 ते मार्च 1990 या कालावधीत औकाफ आणि नगरविकास या खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक 31 ऑगस्ट 2008 रोजी दु:खद निधन झाले.

.... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ .....

सभापती महोदय, कै. पांडुरंग दादासाहेब पाटील यांचा जन्म 1 जुलै 1918 रोजी सातारा जिल्ह्यात कराड येथे झाला. त्यांचे शिक्षण एलएल.बी पर्यंत झाले होते. कै. पांडुरंग पाटील यांनी सुरूवातीस काही काळ वकिली केली होती. श्री शिवाजी एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष तसेच तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट, एसटी महामंडळाचे सदस्य, प्रीतीसंगम उपसा जलसिंचन याजनेचे संस्थापक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व वेणुताई चव्हाण प्रतिष्ठान,कराडचे संस्थापक-सदस्य, सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे व सह्याद्री सहकारी बँकेचे संस्थापक-चेअरमन, कराड शहर व तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, सातारा जिल्हा समांतर काँग्रेसचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. पाटील यांनी कराड नगरपालिकेचे सतत 42 वर्षे नगराध्यक्ष पद भूषविले होते. सर्वाधिकश काळ नगराध्यक्ष पद भूषविण्याचा जागतिक विक्रम केल्याबद्दल "गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड" मध्ये त्यांची नांद घेण्यात आली होती. कराड शहराच्या रचनात्मक प्रगतीचे ते शिल्पकार होते. कै. पाटील 1960 मध्ये विधान परिषदवर तर 1963, 1980 व 1995 असे तीन वेळा सातारा जिल्ह्यातील कराड (उत्तर) मतदारसंघातून महाराष्ट्र विधान सभेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 17 सप्टेंबर 2008 रोजी दु:खद निधन झ ााले.

सभापती महोदय, कै. रमेश मोतीरामजी निकोसे यांचा जन्म 28 डिसेंबर 1937 रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते. कै. निकोसे यांनी फिरोज गांधी विद्यालयाचे अध्यक्ष तसेच दक्षता समिती, दूरध्वनी सल्लागार समिती व प्रौढ शिक्षण समितीचे सदस्य म्हणून काम केले होते. तसेच स्काऊट सोशल वेल्फेअर असोसिएशन व डेमॉक्रॅटिक ट्रेड युनियनचे संस्थापक-अध्यक्ष, ऑल इंडिया बॅकवर्ड क्लासेस रिझर्व्हेशन इम्लिमेंटेशन ॲक्शन कमिटी व मागासवर्गीय महिला उद्योग संस्थेचे संस्थापक, मागासवर्गीय सुधार महासंघ, दलितवर्ग सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सरचिटणीस म्हणूनही त्यांनी काम केले होते.

कै. निकोसे यांनी सफाई कामगारांच्या जीवनावरील 'जलते आँसू' व 'कल की दुल्हन आज की दुष्मन' या हिंदी व 'काही शल्य काही व्यथा', 'बदली' व 'लग्न माझं आहे', 'अश्रुतील भावना

.... एम 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ .....

अंतरिच्या यातना' इत्यादी नाटकांचे लेखन केले तसेच त्यांचे दिग्दर्शन केले व त्या नाटकांमध्ये भूमिकांमध्ये भूमिकाही केल्या आहेत. "गांधी, आंबेडकर, रमाई" हे त्यांचे एकपात्री नाटक खूप गाजले होते. याशिवाय त्यांच्या राष्ट्रीय समस्यांवरील अनक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

कै. निकोसे फेब्रुवारी 2002 मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त झ ाले हाते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 20 सप्टेंबर 2008 रोजी दु:खद निधन झ ाले.

...... एम 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भुजबळ ....

सभापती महोदय, कै. बाजीराव नाना पाटील यांचा जन्म 2 जून 1914 रोजी जळगाव जिल्ह्यात बलवाडी येथे झाला. कै. पाटील यांनी तापी शिक्षण संस्थेचे संचालक, बलवाडी विद्यालयाचे संस्थापक-अध्यक्ष, तांदलवाडी व खिर्डी बुद्रुक विद्यालयाचे अध्यक्ष तसेच जळगाव जिल्हा सहकारी फळविक्री सोसायटी फेडरेशन व जिल्हा सहकारी बँकेचे संचालक, मधुकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. कै. पाटील यांनी बलवाऊी ग्रामपंचायतीचे सलग 25 वर्षे सरपंच, जळगाव लोकल बोर्डाचे व जळगाव जिल्हा परिषदेचे सदस्य तसेच रावेर पंचायत समितीचे सभापती पदही त्यांनी भूषविल होते. शांत व सुस्वभावी नेता अशी त्यांची ओळख होती.

कै. पाटील 1968 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शुक्रवार, दिनांक 10 ऑक्टोबर 2008 रोजी दु:खद निधन इ ााले.

( यानंतर श्री. सरफरे .....एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

सभापती महोदय, मुंबई शहरात अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात व गोळीबारात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान आणि या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल तसेच भारताचे माजी पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करण्यात यावे अशी मी आपणास विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या देशाचे माजी पंतप्रधान माननीय श्री. विश्वनाथ प्रताप सिंहजी हे सन 1989 मध्ये ज्यावेळी खऱ्या अर्थाने पंतप्रधान झाले त्यावेळी लोकसभेमध्ये मी पहिल्यांदा निवडून आलो होतो. त्यामुळे त्यांचे कामकाज अतिशय जवळून पहाण्याचा योग मला आला. श्री. विश्वनाथ प्रताप सिंह हे खरे म्हणजे राजघराण्यात जन्माला आले. ज्याप्रमाणे तथागत गौतम बुध्दांनी आपली राजघराण्यातील वस्त्रे बाजूला काढून आपले राज्य त्यागून गोरगरीबांसाठी व त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी संन्यास धारण केला. त्याप्रमाणे गोरगरीबांच्या कल्याणासाठी श्री.विश्वनाथ प्रताप सिंह यांनी आपली सर्व जमीन भूदान चळवळीसाठी विनोबा भावे यांना दान केली. आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीबाच्या कल्याणांसाठी वाहून घेतलेल्या राजकीय क्षेत्रामध्ये ज्या निष्कलंक चारित्र्याच्या व्यक्ती आहेत त्यातील एक अग्रगण्य व्यक्ती म्हणून श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांची ओळख आपल्याला कायम राहील. स्वच्छ चारित्र्य, तत्वनिष्ठ, संवेदनशील कवी, साहित्यिक अशा अनेक गुणांनी युक्त असे श्री.विश्वनाथ प्रताप सिंह यांचे व्यक्तिमत्व होते. सन 1931 मध्ये अलाहाबाद येथे त्यांचा जन्म झाला. विश्वनाथ प्रताप सिंह यांचे शिक्षण महाराष्ट्रात पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यातील नेतृत्वगुण लोकांना दिसू लागले होते. त्यांच्या शालेय जीवनातील एक आठवलेला प्रसंग मी या ठिकाणी सांगतो. एकदा शाळेच्या एका निवडणुकीत एका शिक्षकाने रस घेतला व एका विद्यार्थ्याला उभे राहण्याची शिक्षा केली. श्री.विश्वनाथ प्रताप सिंह यांना हे आवडले नाही. विद्यार्थ्यांच्या निवडणुकीत शिक्षकांनी हस्तक्षेप करणे योग्य नाही असे आपले ठाम मत असल्याचे सांगून त्यांनी आपल्या वर्ग प्रतिनिधीपदाचा राजीनामा दिला. तत्वासाठी राजीनामा देण्याची त्यांची ही प्रवृत्ती त्यांच्या भावी आयुष्यातही कायम राहिली. सन 1985 मध्ये राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री पदावर असतांना त्यांनी अत्यंत धाडसी निर्णय घेतले होते. काही प्रतिष्ठित आणि धनाढय उद्योगपतींच्या घरावर आर्थिक गैरव्यवहारांच्या कारणास्तव छापे घालण्याचे त्यांनी आदेश दिले होते. पंतप्रधानांसह इतर अनेक मंत्र्यांना त्यांची ही कृती धक्कादायक वाटली पण त्यांनी आपला निर्णय बदलला नाही. अंदाजपत्रक जवळ आलेले असतांना त्यांना अर्थमंत्री पदावरुन बदलण्यात आले व दिनांक 24 जानेवारी, 1987 रोजी त्यांना संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आली पण तेथेही त्यांनी धक्कादायक निर्णय घेण्याची परंपरा सुरु ठेवली.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

अवघी 79 दिवसांची आपली कारकीर्द त्यांनी गाजवली. प्रचंड गाजलेले बोफोर्स तोफा खरेदी प्रकरण त्यांनी उकरुन काढले. आपल्या भूमिकेबद्दल कोणी शंका घेत असेल तर आपण राजीनामा देऊ असे त्यांनी जाहीर केले होते. दिनांक 12 एप्रिल, 1987 रोजी त्यांनी संरक्षण मंत्री पदाचा राजीनामा दिला.

बोफोर्स तोफा खरेदी प्रकरणाप्रमाणेच मंडल आयोग हा त्यांचा संपूर्ण समाजाच्या दृष्टीने गाजलेला टप्पा आहे. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या मुद्यामुळे श्री. व्ही. पी. सिंह यांची प्रतिमा त्यावेळी "आम आदमी का नेता" अशी झाली होती. ज्यावेळी पार्लमेंटमध्ये मंडल आयोग लागू करण्याचा प्रस्ताव आला आणि देशभर जे आंदोलन पेटले त्यावेळी दिल्लीची स्थिती अशी झाली होती की, विद्यार्थ्यांनी स्वत:ला पेटवून घेऊन आत्महत्या केल्या. संपूर्ण दिल्लीला त्यावेळी वेठीला धरले गेले होते. गोरगरिबांना, दलितांना आणि उपेक्षित वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यावेळी ठामपणे उभे राहून मंडल आयोगाची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्यामध्ये श्री. व्ही. पी. सिंह कोठेही डगमगले नाहीत. हा खऱ्या अर्थाने त्यांच्या संपूर्ण जीवनातील महत्वाचा पैलू आहे. समाजातील उपेक्षित, दरिद्री आणि गरीब लोकांना न्याय देण्याची भूमिका त्यांनी आयुष्यभर वठवली. असा हा थोर नेता दिनांक 27 नोव्हेंबर, 2008 रोजी आपल्यातून निघून गेला.

सभापती महोदय, श्री. सूर्यभान वहाडणे यांनी सतत तीन वेळा या सभागृहामध्ये येऊन आपले काम केले. श्री. सूर्यभान वहाडणे यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यातील पुणतांबे येथे झाला. त्यांचे शिक्षण फक्त मॅट्रिक पर्यंत झाले होते. सुरुवातीच्या काळामध्ये श्री. सूर्यभान वहाडणे यांनी घरच्या अत्यंत गरिबीच्या परिस्थितीमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नोकरी स्वीकारली. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे त्यावेळचे पश्चिम महाराष्ट्र विभागाचे संघचालक श्री.दामुअण्णा दाते यांच्या संपर्कामध्ये ते आले. त्यांच्या संपर्कात आल्यानंतर 1963 साली त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सुरु केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असताना जनसंघाची स्थापना झाल्या नंतर त्यांनी जनसंघाच्या कामाची सुरुवात केली. जनसंघाच्या जिल्हा संघटक पदापासून प्रदेश सरचिटणीस पदापर्यंतची अनेक पदे त्यांनी भुषवली. शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या श्री. सूर्यभान वहाडणे यांनी नगर जिल्ह्यासारख्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पूर्वापार काँग्रेसची परंपरा लाभलेल्या जिल्ह्यामध्ये भारतीय जनसंघाच्या कामाला सुरुवात केली. खरे म्हणजे त्यावेळी जनसंघाकडे भटाबामणांचा पक्ष म्हणून पाहून जनसंघाची प्रतारणा केली जात असे. समाजामध्ये जनसंघाकडे पाहण्याचा असा दृष्टीकोन असताना बहुजन समाजामध्ये जन्म घेऊन खऱ्या अर्थाने त्या वेळच्या जनसंघाला बहुजन समाजाचा पक्ष बनविण्यासाठी त्यांनी अहमदनगर सारख्या जिल्ह्यामध्ये कष्ट घेतले. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात ते सायकलवर फिरुन आपले काम करीत असत. त्या काळात जनसंघाकडे कोणतीही साधने नसताना सायकलवर फिरुन गावागावात एक एक माणूस जोडण्याचे काम करुन श्री. सूर्यभान वहाडणे यांनी आपल्या पक्षाचे काम उभे केले. खरे म्हणजे त्या काळात जनसंघाला कधी सत्ता मिळेल अशी सुतराम शक्यता नसताना केवळ हिंदुत्वाच्या प्रेमापोटी त्यांनी पक्षाचे काम सुरु ठेवले व पक्षात स्वत:ची अशी एक आगळीवेगळी प्रतिमा निर्माण केली. त्यांनी आणीबाणीच्या काळात 18 महिन्यांचा तुरुंगवास भोगला. गोरगरीब शेतकरी, खंडकरी शेतकरी यांच्या समस्या घेऊन त्यांनी अनेक आंदोलने केली. ज्यावेळी जनता पक्ष आणि भारतीय जनता पक्ष तयार झाला त्याच्या आधी जनसंघामध्ये विविध आघाड्यांचे काम चालू होते. त्या विविध आघाड्याचे काम होत असताना श्री. सूर्यभान वहाडणे यांच्याकडे शेतमजूर आघाडीचे काम देण्यात आले होते. शेतमजूर आघाडीचे काम करीत असताना भारतीय जनसंघाला शेतकऱ्यांमध्ये आणि शेतमजुरांमध्ये नेण्याचे काम त्या काळामध्ये त्यांनी आपल्या पदाला न्याय देऊन केले आणि हा पक्ष गोरगरिबांमध्ये नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाला बहुजनाचा चेहरा देण्यामध्ये श्री. सूर्यभान वहाडणे यांचा फार मोठा वाटा होता. त्यांच्या या कामगिरीमुळेच पक्षाने त्यांच्यावर विधान परिषदेच्या उपसभापती पदाची जबाबदारी सोपवली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ श्री.बरवडनंतर 14:15

श्री.पांडुरंग फुंडकर.....

ती जबाबदारी त्यांनी समर्थपणे निभावली होती. एका बाजूला सरचिटणीसपद समर्थपणे भूषवित असताना सन 1994 साली पक्षाने त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आणि ती देखील त्यांनी समर्थपणे पेलली. श्री.सूर्यभानजी वहाडणे हे प्रदेश अध्यक्ष असताना महाराष्ट्रामध्ये ख-या अर्थाने सत्तांतर होऊन पहिले बिगर काँग्रेस पक्षाचे सरकार म्हणजे युतीची सत्ता महाराष्ट्रामध्ये आली. शिवसेना-भाजपाचे सरकार आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतक-यांना असे वाटले होते की, जनसंघामध्ये, शेतक-यांमध्ये काम करणारे नेते श्री.सूर्यभान वहाडणे यांच्याकडे कृषी मंत्री पदाची जबाबदारी येईल. परंतु कृषी मंत्री पदाला त्यांनी ठोकर मारत मला सत्तेमध्ये, मंत्रिमंडळामध्ये सहभागी व्हावयाचे नाही, मला संघटनेमध्ये राहून काम करावयाचे आहे असे ठामपणे, ठोकपणे सांगणारे श्री.सूर्यभान वहाडणे यांचे एकमेव उदाहरण असू शकेल. कारण आज मंत्री पदासाठी संघटना सोडली जाते, तत्वाला मुरड घातली जाते, मंत्रिमंडळामध्ये आपली वर्णी लागावी अशी अनेकांची मनिषा असते, अशा काळामध्ये श्री.वहाडणे यांनी कृषी मंत्री पद बाजूला सारुन संघटनेचे काम करण्याचे मान्य केले. सत्तेपेक्षा समाजसेवेमध्ये रमणारा नेता अशी त्यांनी आपली प्रतिमा निर्माण केली होती.

श्री.सूर्यभान वहाडणे हे प्रदेश अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळामध्ये मी सरचिटणीस म्हणून काम करीत होतो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले होते की, भारतीय जनता पक्ष हा शेतकरी, शेत मजूर आणि सर्वसामान्यांचा पक्ष झाला पाहिजे असे तुम्ही कार्य करावे. त्यांच्या अध्यक्ष पदाच्या काळात त्यांनी मला ही प्रेरणा दिली. मला त्यांनी सांगितले होते की, तू शेतक-याचा मुलगा आहेस, या पक्षामार्फत शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला पाहिजे. त्यांनी मला प्रेमाने सांगितले नाही तर आदेश देऊन सांगितले होते की, खामगाव ते नागपूरपर्यंत कापूस उत्पादक शेतक-यांसाठी तू पदयात्रा काढली पाहिजे. त्यांच्या आदेशामुळे मी 17 दिवस पदयात्रा काढली होती. अशाप्रकारे शेतक-यांच्या प्रश्नासाठी नेतृत्व तयार करण्याची कला त्यांच्या अंगी होती. त्या पदयात्रेच्या माध्यमातून पक्षाला सर्वसामान्य माणसामध्ये, शेतक-यांमध्ये स्थान मिळाले. असा हा कर्मठ, शिस्तीचा नेता पक्षाला लाभला होता. मोडेन पण

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर......

वाकणार नाही अशी भूमिका त्यांनी शेवटपर्यंत जोपासली. त्यांच्या निधनापूर्वी एक महिना अगोदर मी त्यांना कोपरगावला त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी गेलो होतो. सध्या पक्षामध्ये काय चालले आहे, पक्षाचे काम कसे सुरु आहे ? हा पहिला प्रश्न मला त्यांनी विचारला होता. मला त्यांनी त्यांच्या तब्येतीबद्दल बोलू दिले नाही. राज्यामध्ये पक्षाची स्थिती कशी आहे, देशाच्या राजकारणात काय चालले आहे, अशी विचारणा केली. म्हणजे शेवटचा श्वास असेपर्यंत त्यांच्या नसानसामध्ये पक्ष भिनला होता.

सभापती महोदय, या सदनाचे उपसभापती म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम आहे. ते 3 टर्म या सभागृहाचे सदस्य होते. अशाप्रकारचा कर्मठ नेता आज आपल्यामध्ये नाही. त्यांना मी आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, माजी वि.प.स. हे देखील विदर्भातील नेते होते. श्री.देशमुख यांना लोक टी.जी.म्हणून ओळखत होते. खरे म्हणजे श्री.देशमुख आणि माझा 1978-80 च्या काळात परिचय झाला होता. स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीचे ते नेते होते. त्या काळात स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलने होत होती त्यावेळी वैदर्भीय नेत्यांमध्ये श्री.टी.जी.देशमुख अग्रभागी होते. पक्ष कोणताही असो, परंतु स्वतंत्र विदर्भ झाल्याशिवाय विदर्भाला न्याय मिळणार नाही अशी त्यांची ठाम धारणा होती. श्री.टी.जी.देशमुख यांचा स्वभाव देखील कर्मठ होता. विदर्भवादी चळवळीचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. विधानसभेचे सदस्य, विधान परिषदेचे सदस्य, राज्यसभेचे सदस्य आणि नागपूर महानगरपालिकेचे महापौर म्हणून त्यांनी कारकीर्द गाजविली आहे. विदर्भातील अशा या कठोर व कट्टरवादी नेत्याचे निधन झालेले आहे, त्यांना मी आदरांजली अर्पण करतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ 14:20

(श्री. पांडुरंग फुंडकर..)

कै. पांडुरंग दादासाहेब पाटील यांचा जन्म सातारा जिल्ह्यात कराड येथे झाला. तेही आपल्या सभागृहाचे सदस्य होते.

कै. रमेश मोतीरामजी निकोसे हे दलित चळवळीतील नेते. ते देखील आमच्या विदर्भातील होते. दलित चळवळीमध्ये काम करीत असताना समाज प्रबोधन करणारी नाटके त्यांनी लिहिली. 2002मध्ये ते विधानपरिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त झाले. सभागृहामध्ये कधी तरी तणाव निर्माण झाला आणि त्यावेळी निकोसे हे उभे राहिले तर सभागृहातील तणाव निवळून जात असे. अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आज सभागृहामध्ये नाही.

कै. बाजीराव नाना पाटील हे जळगाव जिल्ह्यातील होते. 1968मध्ये ते महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निवडून आले होते. तेही आज या जगात नाहीत. या सर्व दिवंगत सदस्यांना मी माझ्या आणि माझ्या पक्षातर्फे आदरांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी श्री. विश्वनाथ प्रताप सिंह, भारताचे माजी पंतप्रधान, श्री. सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उप सभापती, विधानपरिषद, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महमद इसाक जमखानावाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील माजी वि.प.स. यांच्या दुख:द निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी भावपूर्ण आदरांजली वाहिलेली आहे.मी देखील या सर्वांना माझ्या शिवसेना पक्षाच्या वतीने आदरांजली वाहते.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ज्यांच्या बद्दल आपली मानसिकता आणि सामाजिक ऋण व्यक्त करता यावेत यासाठी हा श्रध्दांजलीचा प्रस्ताव आपण मांडत असतो. अनपेक्षितरित्या माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह यांचे निधन झाले. ब-याच दिवसापासून ते कर्क रोगाने आजारी होते. विश्वनाथ प्रताप सिंह यांचे नाव संपूर्ण हिंदुस्थानामध्ये खास करुन यासाठी घेतले जाते की मतभेद आणि विवेक यामधील द्वंद्व एखाद्या राजकारणातील व्यक्तीसमोर जेव्हा उभे रहाते अशा वेळेला आपल्याला कोण विरोध करील किंवा कोण काय म्हणेल याचा विचार न करता सपूंर्ण राजकारणाला कलाटणी मिळू शकेल अशा प्रकारचे निर्णय घेणारे व्यक्तिमत्व आपल्या समोर उभे रहाते. एका अर्थाने लोकनायक जयप्रकाश नारायण यांचा वेगळया अर्थाने राजकीय वारसा त्यांनी पुढे नेला असे मला म्हणावेसे वाटते. 1989मध्ये पंतप्रधान पदावर असताना महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिवर्षानिमित्त हिंदुस्थानामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये अनेक कार्यक्रम होत होते. त्यावेळी पुण्यामध्ये अतिशय भव्य अशी कष्टकरी परिषद घेण्यात आली होती. तसेच महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिवर्षाच्या निमित्ताने सत्य शोधक परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी स्वत: पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह हे उपस्थित होते. श्री. रामविलास पासवान हे देखील त्यावेळी उपस्थित होते. त्यावेळी या कष्टकरी गोरगरीब समाजातील महिलांच्या प्रश्नासाठी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून स्त्रीमुक्तीचा जो एक जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला होता त्याला देखील त्यांनी पंतप्रधान या नात्याने पुरस्कारीत केले होते. त्यामधून त्यांनी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यासाठी चालना दिली. नंतर मंडल आयोगावर

..3..



MSS/ MMP/ 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे..

संपूर्ण हिंदुस्थानामध्ये राजकारणाला कलाटणी देणारी त्यांची भूमिका त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखविली आणि सत्तेचे सामर्थ्य काय असते याचा देखील प्रत्यय त्यांनी पंतप्रधान पदावर असताना आणून दिला. विश्वनाथ प्रताप सिंह यांचे नाव धेतले तरी राजकारणामधील आणि विशेष करुन काँग्रेसमधील मंडळी काही काळ दचकायची. याचे कारण विश्वनाथ प्रताप सिंह यांनी बोफोर्स बद्दल पहिल्यांदा आवाज उठविला. आज देखील बुलेट प्रूफ जाकिटांच्या प्रश्नाच्या माध्यमातून बोफोर्स सारख्या घटना खदखदत असल्याचे चित्र आपल्याला दिसते.

.. नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

अशा परिस्थितीमध्ये श्री.विश्वनाथ प्रताप सिंह यांचे निधन हे मुंबईवर हा जो हल्ला झाला त्या सुमारास झाले. मुंबईवर झालेल्या हल्ल्याच्या निमित्ताने संपूर्ण देशातील जनता शोकात बुडाली होती, श्री.विश्वनाथ प्रताप सिंह हे देखील देशातील संपूर्ण जनतेच्या शोकामध्ये वेगळया प्रकारे सहभागी झ ाले, अशा पध्दतीने त्यांचा प्राण त्यांच्या कुडीमधून निघून गेला असे म्हणावे लागेल. कै.विश्वनाथ प्रताप सिंह यांच व्यक्तिमत्त्व अतिशय साधे होते. ते कवी मनाचे होते. स्वत:भोवती सत्तेचे वर्तूळ सांभाळण्यापेक्षा एक व्यक्ती म्हणून देखील ते अनेक चळवळींशी जोडले गेलेले होते. कै. विश्वानाथ प्रताप सिंह यांना मी आदरांजली अर्पण करते.

कै.सूर्यभान वहाडणे यांनी पश्चिम महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया चळवळींमध्ये भाग घेऊन सक्रीय कार्य केलेले आहे. शेतक-यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिलेला आहे. कोपरगाव अथवा नगर येथे एखादी कार्यक्रम असला तर ते त्या कार्यक्रमाच्या ठिक्ाणी भेटले नाहीत, असे कधीही घडले नाही. गेल्या वीस,पंचवीस वर्षातील सगळया महत्वाच्या घटनांना कलाटणी देण्याचे काम करणारी ती व्यक्ती होती. आज राजकारणात वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्त्व असणा-या अनेक व्यक्ती आहेत, परंतु कै.सूर्यभान वहाडणे यांचे व्यक्तिमत्त्व अगदी साधे, सरळ आणि निगर्वी असे होते. आम्ही सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी कोपरगाव येथे ज्या ज्या गेलो, त्या त्या वेळी त्यांनी आम्हाला भेट देऊन अतिशय मौलिक सूचना देण्याचे काम केलेले आहे.खास करुन शिवसेना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेचे कार्याध्यक्ष माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या नगर जिल्हयातील सभांना ते कितीही अस्वस्थ असले तरी तेथे उपस्थित रहावयाचे. आपले व्यक्तिमत्त्व किती मोठे आहे याची जाणीव न करुन देता चार-चौधांमध्ये थांबून आपण एक सच्चे कार्यकर्ते आहोत, यासंबंधीचे दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून सातत्याने दिसत असावयाचे. कै.सूर्यभान वहाडणे यांचे चिरंजीव देखील राजकारणात आहेत. कै.सूर्यभान वहाडणे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर मोठा आघात झालेला आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खामध्ये मी व माझा पक्ष सहभागी आहे असे मी या प्रसंगी नमूद करु इच्छिते.

कै.टी.जी.देशमुख यांचे वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्त्व होते. स्वतंत्र विदर्भाच्या बाबतीत त्यांचा आग्रह होता. श्री.अणे यांचा विचारांचा वारसा घेऊन ते शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत होते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

राजकारणी आणि साहित्यिक याचे एक वेगळया प्रकारचे समीकरण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होते. त्यांना श्रध्दांजली देण्याची वेळ नागपूरच्या अधिवेशनात आली आहे, हा एक वेगळा नियतीचा न्याय आहे असे मला म्हणावेसे वाटते. मृत्यू हा कोणाच्या हाती नसतो. विदर्भामध्ये अधिवेशन होत असताना कै.टी.जी.देशमुख यांना आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत, हा एक वेगळया प्रकारचा नियतीचा न्याय आहे किंवा ज्यास आपण कार्मिक जस्टीस असे म्हणू शकतो अशा पध्दतीचा तो आहे किंवा काय असे मला निश्चितपणाने वाटते. संयुक्त महाराष्ट्र की स्वतंत्र विदर्भ याच्याच बरोबर विदर्भातील जनतेच्या प्रश्नांसाठी काम करण्याची त्यांची तळमळ होती, त्यांच्या त्या तळमळीचे प्रश्न सोडविण्याकामी सर्व सन्माननीय सदस्यांनी इच्छाशक्ती तयार करावी हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरु शकेल असे माझे मत आहे.

कै.डॉ.इसाक जमखानवाला हे मुस्लिम समाजाचे नेतृत्व करणारे वक्ते होते. मुस्लिम समाजाला शिक्षणातून विकासाकडे नेणारे एक वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्त्व होते. कोणत्याही वादविवादात सापडण्या ऐवजी समाजाला चांगल्या प्रकारे दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. महाराष्ट्रात खास करुन मुंबई शहरामध्ये मुस्लिम समाजातील सुशिक्षित समुदाय आहे त्यांच्याशी कै.डॉ.इसाक जमखानवाला यांचा संबंध आलेला आहे. शिक्षणातून संस्कार करण्याचे आणि देशहिताचे काम करण्याचे काम त्यांनी मोठया प्रमाणात केले आहे. मी शिवसेना पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

कै.पांडुरंग दादासाहेब पाटील हे महाराष्ट्रातील अतिशय कुशल राजकारणी होते. संपूर्ण राज्यातील राजकारणाची त्यांना माहिती होती आणि म्हणूनच त्यांचे नाव शोक प्रस्तावात श्री.पांडुरंग दादासाहेब पाटील असे नमूद केलेले आहे. कराड तालुक्यातील प्रत्येक गावात पी.डी.पाटीलजी म्हणून ते अतिशय परिचीत होते. पूर्वी ब्रिटीश साम्राज्यामध्ये म्हटले जावयाचे की, सूर्य मावळत नाही. परंतु कराडमध्ये गेली 42 वर्षे नगराध्यक्ष म्हणून त्यांनी भूमिका निभावली आहे. कराड पर्यायाने सातारा जिल्हयामध्ये सहकार क्षेत्रात त्यांची मोठी पकड होती. राजकारणात अनेक वेळेला स्थित्यंतरे झाली. परंतु कै.पांडुरंग दादासाहेब पाटील व त्यांच्या कुटुंबियांचा संपूर्ण सातारा आणि कराड येथे मोठया प्रमाणात प्रभाव आहे असे आपल्याला दिसून येते. कै. पांडुरंग दादासाहेब पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल शिवसेना पक्षाच्यावतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करते.

3....



डॉ.नीलम गोऱ्हे...

कै.रमेश मोतीरामजी निकोसे यांच्या मृत्यूची बातमी ऐकल्यानंतर अतिशय दु:ख झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व असे होते की, निकासे हे थोडया वेळेनंतर फोन करतील आणि म्हणतील की,मी तुमची कशी थट्टा केली, मला बघावयाचे होते की, कोण कोण माझ्या मृत्यूनंतर कसे कसे बोलत आहेत...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

एक वेगळया प्रकारचे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या नावावरुन काही वेळेला त्यांची थट्टा केली जायची. तरी देखील महिलांचे प्रश्न असतील, आंबेडकर चळवळीचे प्रश्न असतील, नागपूरमधल्या रुग्णालयातून एखादे छोटे बालक कुत्र्याने पळवून नेले असेल अशा प्रश्नांबद्दल त्यांची भूमिका अधिक तळमळीची असायची. त्यांची बातमी येवो किंवा न येवो, मंत्रीपद मिळो किंवा न मिळो, विदर्भाच्या दलित चळवळीचे ते मूकनायक होते. त्यांचे नाव महाराष्ट्रात ठराविक लोकांना माहित असेल. परंतु त्यांची तळमळ वेगळ्या प्रकारची होती. राजकारणात त्यांना आणखी काही कामे करायची होती. ते मनातून खूप अस्वस्थ होते. ज्या लोकांना सोबत घेऊन, ज्यांचे प्रश्न घेऊन ते तळमळीने याठिकाणी मांडत होते त्या प्रश्नांना कसा न्याय मिळणार? व्यक्ती ही सापेक्ष असते. काम पुढे चालू राहते. परंतु निकोसे यांच्या पाठिमागे जो समूह आहे, बरोबरचे जे लोक आहेत त्यांचा खऱ्या अर्थाने वाली निघून गेला असे म्हणावे लागेल. निकोसे यांची या सदनाला सातत्याने आठवण येत राहील. खास करुन वेगवेगळया ठिकाणी दलितांवर झालेल्या अत्याचारांच्या प्रश्नाबाबत वृत्तपत्रातून बातम्या येत असत, त्याखेरीज अनेक घटना त्यांच्याकडे सातत्याने येत असत. नाटकाचे ते शौकीन होते. त्यांची खूप इच्छा होती की, त्यांचे नाटक संपूर्ण सभागृहाने बघावे. परंतु आपण सर्वच सभासदांची इच्छा पूर्ण करु शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. निकोसे यांच्या दु:खद आणि आकस्मिक निधनाबद्दल मी त्यांना श्रध्दांजली वाहते आणि त्यांचे कुटुंबीय आणि त्यांच्या बरोबरचे कार्यकर्ते यांचे जे प्रश्न असतील ते मांडण्यासाठी देखील आपण प्रयत्न केले पाहिजेत असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, कै.बाजीराव नाना पाटील यांचे व्यक्तिमत्व राजकारणामध्ये चांगला ठसा उमटेल अशा प्रकारचे होते. आपण सभागृहात अनेकदा श्रध्दांजली वाहतो. आज याठिकाणी श्रध्दांजलीच्या निमित्ताने दुर्दैवाने दु:खद भावना व्यक्त करीत असताना समर्थ रामदासांच्या चार ओळींचा उल्लेख करावासा वाटतो.

जीवा कर्म योगी जनी जन्म झाला
परि शेवटी काळमुखी निमाला
महाथोर ते मृत्युपंथेची गेले
किती एक ते जन्मले आणि मेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे............

त्याच मार्गाने प्रत्येक मनुष्यमात्राला जावे लागणार आहे. म्हणून जेव्हा आपण राजकारणाच्या पलिकडे सामाजिकदृष्टया संवेदनशील व विवेकी भूमिका बजावू तेव्हाच आपले जीवन सार्थकी लागेल. अशा प्रकारचे जीवन व्यतीत करणे हीच त्यांना श्रध्दांजली वाहिली जाईल एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. जय हिंद जय महाराष्ट्र!

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कै.व्ही.पी.सिंह यांच्या निधनाने एक अतिशय प्रदीर्घ अशी संसदीय कारकीर्द लाभलेला भारतातील थोर नेता आपल्यातून निघून गेला आहे. दोन वेळा उत्तरप्रदेशच्या विधानसभेत, एकदा उत्तरप्रदेशच्या विधानपरिषदेत, तीन वेळा देशाच्या लोकसभेत आणि एक वेळा राज्यसभेमध्ये सदस्य म्हणून ते निवडून गेले होते. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री, केंद्रातील अनेक खात्यांमध्ये उपमंत्री, राज्यमंत्री आणि मंत्री होते आणि देशाचे पंतप्रधानही होते. ही त्यांची संसदीय कारकीर्दीची बाजू झाली तरी ही संसदीय कारकीर्द सुरु होण्यापूर्वी स्वातंत्र्यानंतरच्या 5-10 वर्षाच्या काळात हॅवज्पेक्षा हॅवज् नॉट यांच्या बाजूने ठळकपणे उभा राहणारा तरुण नेता अशी 1957 पासून त्यांची ओळख आहे. स्व.विनोबाजींच्या चळवळीत भाग घेऊन आपली सारी जमीन त्यांनी दान दिली. कै.व्ही.पी.सिंह यांचे त्या काळामध्ये हे गाजलेले उदाहरण होते. शिवाय हे उदाहरण त्यांची संसदीय कारकीर्द सुरु होण्यापूर्वीचे होते. संसदीय कारकीर्द सुरु झाल्यानंतर सुध्दा या भूमिकेला ते चिकटून राहिले याची दोन ठळक उदाहरणे माझ्यासमोर आहेत. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरांविरुध्द विशेष मोहीम राबवून कुविख्यात दरोडेखोरांना आत्मसमर्पण करण्याची संधी देण्याची भूमिका स्वीकारली. ही घटना संपूर्ण देशाच्या लक्षात राहणारी होती. देशाचे पंतप्रधान म्हणून काम करायला लागल्यानंतर बी.पी.मंडल यांचा अहवाल अनेक वर्षे पडून होता तो समोर आणून इतर मागासवर्गीयांना आरक्षण दिले पाहिजे अशी त्यांनी ठामपणाने भूमिका घेतली. अनेकजण ठामपणाने भूमिका घेतात परंतु सत्तेच्या प्रवासामध्ये त्याचा त्यांना विसर पडतो. याला अपवाद म्हणून उदाहरण द्यायचे झाले तर कै.व्ही.पी.सिंह यांचे द्यावे लागेल.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख .......

ते अतिशय उत्तम चित्रकार, उत्तम कवी होते. त्यांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

त्यानंतर या सभागृहाचे माजी पीठासीन अधिकारी उप सभापती कै. सूर्यभान वहाडणे आपल्यापैकी जवळपास सर्वांनीच त्यांच्या कामाचा अनुभव घेतलेला आहे. आपल्या विचारांवर आणि भाषेवर ठाम राहणाऱ्या नेत्यांमध्ये कै. वहाडणे यांचा समावेश आपल्याला करता येईल. ग्रामीण भागात त्यांनी आपली चळवळ सातत्याने कायम ठेवली होती. पीठासीन अधिकारी म्हणून स्थानावर बसल्यानंतर ते कोणत्याही पक्षाचे नसायचे. सातत्याने विरोधी पक्षातच त्यांनी काम केले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना कृषी मंत्री म्हणून जाण्याची संधी मिळाल्यानंतर सुध्दा त्यांनी ती घेतली नाही आणि ही बाब एका ज्येष्ठ नेत्याने सांगितल्यानंतर त्याला आणखी मजबुती येते. सातत्याने विरोधी पक्षात काम केल्यानंतर सभागृहात विविध आयुधांचा वापर करणाऱ्या सदस्यांबद्दल त्यांना सहानुभूती असे तसेच पीठासीन अधिकारी म्हणून त्यांनी अनेक महत्वाच्या प्रश्नांना त्यांनी न्याय दिलेला आहे. अशा नेत्याला मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

यानंतर आमच्या विदर्भातील नेते श्री. त्रिंबकराव गोपाळराव देशमुख हे अत्यंत आक्रमक असे नेतृत्व होते. विद्यार्थी दशेपासूनच ते आक्रमक होते. अमरावतीमधील किंग एडवर्ड कॉलेजमध्ये डायरेक्ट निवडणुकीतून ते कॉलेजचे जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आले होते. त्या काळात मी प्रायमरीमध्ये होतो. त्यावेळेस हे इलेक्शन फार गाजले होते. त्यानंतर सुध्दा कै. टी.जी.देशमुख यांनी ती आक्रमकता कायमच ठेवली होती. शिक्षण संस्थांचे अध्यक्ष राहून सुध्दा शिक्षण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांपासून कसे दूर राहिले पाहिजे याचे प्रसिध्द उदाहरण म्हणून कै. टी.जी.देशमुखांकडे पाहिले जात असावे. नागपूर शिक्षण मंडळाचे अनेक वर्षे ते अध्यक्ष व पदाधिकारी होते. त्याचबरोबर ते उत्तम पत्रकार, साहित्यिक व लेखकही होते. या सभागृहात उमरखेड तालुक्यातील एका छोट्याशा गावातून ते निवडून आले होते. एकदा उन्हाळ्यात ते त्या गावाला गेले असता तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी सभागृहातच ही मागणी मांडली आणि पुसद येथील धरणाचे पाणी नदीने त्या गावाला पुरविण्याचा आग्रह धरला व त्यात त्यांना यश मिळाले, ही आठवण मी विसरु शकत नाही. वस्तुत: त्या गावाशी त्यांचा संपर्क तुटलेला होता. परंतु तरी देखील एका धरणापासून केवळ 10 किलोमीटर अंतरावर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .........

असलेल्या गावाला साधे पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नाही, ही बाब त्यांना खटकली म्हणून त्यांनी प्रकर्षाने ही बाब सदनात मांडली होती. अशा नेत्याला मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. रमेश निकोसे स्व. बाबासाहेबांच्या विचारांचे नेते होते. त्यांनी एक एकांकिका देखील लिहिली होती व त्यात ते स्वत:च भूमिका करीत होते व अतिशय ठामपणे आपले विचार मांडत असत. त्यांनाही मी आदरांजली अर्पण करतो. त्याचबरोबर माजी मंत्री व विधानपरिषद सदस्य कै. इसाम जमखानवाला, पांडुरंग पाटील, बाजीराव पाटील या माजी सदस्यांचेही दु:खद निधन झाले त्यांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----------------

......3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभागृहाचे नेते व मा. उप मुख्यमंत्री यांनी भारताचे माजी पंतप्रधान कै. विश्वनाथ प्रतापसिंग, माजी उपसभापती कै. सूर्यभान वहाडणे, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महंमद इसाक जमखानवाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या शोक प्रस्तावाला माझ्या पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यासाठी व दिवंगत नेत्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माजी पंतप्रधान कै. व्ही.पी.सिंग हे राजकारणातील एक अत्यंत ताकदवान व्यक्तिमत्व होते. निरनिराळ्या पक्षातून अनेक पदे त्यांनी भुषविली होती. सन 1989 मध्ये बिगर काँग्रेस सरकारचे ते पंतप्रधान झाले होते. त्यांच्या पदाच्या कारकिर्दीत त्यांनी सामाजिक न्याय म्हणून इतर मागासवर्गीयांसाठी 27 टक्के जागा आरक्षित करण्यासाठी मंडल आयोगाने केलेली शिफारस मान्य करण्याचा अत्यंत धाडसी निर्णय घेतला होता....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

त्यामुळे मंडल आयोगाच्या शिफारसीची अंमलबजावणी करणारे ते खरे जनक ठरले. परंतु या निर्णयामुळे प्रामाणिक, अभ्यासू व ध्येयवादी नेत्याला सत्तेपासून मात्र पायउतार व्हावे लागले. कै. व्ही.पी.सिंह यांचे 27 नोव्हेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले.

माजी उपसभापती व भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष श्री. सूर्यभान रघुनाथ वहाडणे यांचे 2 नोव्हेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले. ते एक सज्जन, प्रामाणिक व निर्मळ मनाचे व सत्याची कधीही तडजोड न करणारे नेते होते. सर्व राजकीय पक्षाशी मैत्रीचे संबंध असणारा नेते म्हणून कै. सूर्यभान वहाडणे यांच्याकडे बघितले जात होते. त्यांच्या निधनामुळे भाजपामध्ये आदर्श विचाराची पोकळी निर्माण झाली आहे.

माननीय राज्यपाल महोदयांतर्फे कै. रमेश मोतीरामजी निकोसे यांची नियुक्ती झाली होती. कै. रमेश निकोसे यांचे दिनांक 20 सप्टेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले. या सभागृहात मला त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली होती. कै. रमेश मोतीरामजी निकोसे हे हरहुन्नरी होते. त्यांचा स्वभाव सर्वांच्या मनात राहण्यासारखा आहे.

तसेच या सभागृहाचे माजी सदस्य कै.त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, कै. महमद इसाक जमनाखानावाला, पांडुरंग पाटील, बाजीराव नाना पाटील यांचेही दु:खद निधन झाले असून या सर्व दिवंगत नेत्यांना माझ्या पक्षातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

-----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्यासंदर्भात माझ्या संवेदना व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या देशाचा सामाजिक राजकारणाचा नकाशा बदलवण्याचे काम कोणी केले असेल तर ते कै. विश्वनाथ प्रताप सिंह यांनी केलेले आहे. कै. विश्वनाथ प्रताप सिंह हे कवी होते, कलावंत होते. सामाजिक न्यायाचा मोठा कैवारी दुसरा कोणताही राजकारणी झाला नाही या शब्दातच त्यांचे वर्णन आपल्याला करावे लागेल.

कै.सूर्यभान रघुनाथ वहाडणे यांचे व्यक्तिमत्व सालस, निरपेक्ष होते. त्यांची आपल्या पक्षावरील निष्ठा अत्यंत अविचल होती. मी या सभागृहातील वरच्या गॅलरीत बसून त्यांचे काम पहात होतो. अशी माणसे पुन्हा या ठिकाणी यावीत अशी प्रत्येकाला अपेक्षा असणार आहे.

कै. त्रिंबकराव गोपाळराव देशमुख यांचा मला व्यक्तिगत स्नेह मिळाला होता. विदर्भाच्या प्रश्नावर ते नेहमी आक्रमक असत. आचार्य अत्रे यांच्याशी त्यांचे वाक्‌युध्द झाले होते परंतु त्यानंतर कै. अत्रे यांनी त्यांना बोलावून मनात कोणतीही कटुता न ठेवता त्यांचा सन्मान देखील केला होता. सर्व दिवंगत नेत्यांना विनम्र अभिवादन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड (नामनियुक्त ) : या सभागृहाचे नेते माननीय भुजबळ साहेबांनी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. माजी पंतप्रधान कै. विश्वनाथ प्रताप सिंह तसेच इतरही दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली वाहणारा हा प्रस्ताव आहे. कै. विश्वनाथ प्रताप सिंह हे केवळ भारताचे पंतप्रधान होते म्हणून ते प्रसिध्द आहेत असे नसून ते स्वत: राजा असून त्यांनी आपली सर्व वस्त्रे बाजूला ठेवून गरिबांची बाजू घेणारा आधुनिक काळातील ते एक राजे होते. सिध्दार्थ कॉलनी, चेंबूर या ठिकाणी दसरा मेळावा झाल्यानंतर जो बेछूट गोळीबार झाला आणि त्या गोळीबारामध्ये ज्यांचा काही संबंध नाही अशी बरीचशी माणसे मारली गेली त्यांचे अश्रू पुसण्यासाठी स्वत: कै. विश्वनाथ प्रताप सिंह त्या ठिकाणी आले होते. एवढेच नव्हे तर पंतप्रधान असतांना मंडल आयोगाच्या आरक्षणाचा प्रश्न आला. संपूर्ण देशाचे चित्र या व्यक्तीने बदलवले होते. त्यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी केली होती. ही अंमलबजावणी करीत असतांना आपले किती नुकसान होईल हे त्यांनी पाहिले नाही. परंतु गोरगरिबांची बाजू घेणारा, गरिबांबद्दल कणव असणारा नेता काल परवा मुंबईवर अतिरेक्यांनी जो हल्ला केला त्या काळातच आपल्यातून निघून गेला. ते पंतप्रधान पदी काही काळ होते. तसेच माजी पंतप्रधान झाल्यानंतर देखील ते मुंबई सारख्या शहरामध्ये झोपडपट्टीवासियांच्या आंदोलनासाठी आले होते. अशा प्रकार पंतप्रधान पद भुषविलेली व्यक्ती आंदोलनासाठी आल्याचे मी तरी पाहिले नाही. असे महान व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले त्य कै.विश्वनाथ प्रताप सिंहांना मी माझ्या रिपब्लिकन पक्षातर्फे श्रध्दांजली वाहतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुमंत गायकवाड.....

कै.रमेश निकोसे दलित समाजाचे होते. त्यांचा आणि माझा चांगला परिचय होता. त्यांचे दिनांक 20 सप्टेंबर, 2008 रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल मी अतीव दुःख व्यक्त करतो.

कै.सूर्यभान वहाडणे,माजी उपसभापती, विधानपरिषद, सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, इसाक जमखानवाला, माजी वि.प.स. व मंत्री, सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील व बाजीराव नाना पाटील,माजी वि.प.स. यांच्या दुःख निधनाबद्दल मी त्यांना माझ्यावतीने तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ): सभापती महोदय, सभागृहाचे नेते मा.श्री.छगन भुजबळ यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

कै.विश्वनाथ प्रताप सिंह यांचा जन्म राजघराण्यात झाला. 1957 मध्ये विनोबाजींच्या भूदान चळवळीत भाग घेऊन त्यांनी आपली सर्व जमीन दान दिली व आपले नाते राजघराण्याशी न ठेवता गरिबांच्या हितासाठी ठेवले. त्यामुळे व्ही.पी.सिंह यांची प्रतिमा जनतेच्या मनावर राज्य करणारा राजा अशाप्रकारची झाली होती. कै.व्ही.पी.सिंह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्यांनी चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरांना त्यांना आत्मसमर्पण करायला लावून त्यांना समाजात सन्माननाने आणण्याचा प्रयत्न केला. समाजातील तळाच्या घटकातील तसेच वंचितांची कणव असलेला नेता म्हणून कै.व्ही.पी.सिंह यांचे नाव भारताच्या राजकारणात सदैव घेतले जाईल. मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करुन सामाजिक न्यायाचे त्यांनी अखेरपर्यंत समर्थन केले.

कै.व्ही.पी.सिंह कवी व लेखक म्हणून प्रसिध्द होते. अशा या ध्येयवादी समाजसेवकाचे दिनांक 27 नोव्हेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

आदरणीय कै.सूर्यभान वहाडणे या सभागृहाचे उपसभापती होते. आपल्या विचारांकरिता त्यांनी चालून आलेली राजकीय पदे सोडून दिली. परंतु त्यांनी आपल्या विचारांशी निष्ठा कायम ठेवली. या सभागृहाचे उपसभापती म्हणून काम करीत असताना त्यांनी सभागृहाच्या प्रथा, परंपरा अतिशय सन्मानाने जतन केल्या. अशा या ज्येष्ठ समाज सेवकाचे रविवार दिनांक 2 नोव्हेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. टी.जी.देशमुख यांना मी युवक काँग्रेसच्या चळवळीपासून ओळखत होतो.स्व.इंदिरा गांधी यांचे निकटवर्तीय म्हणून ते ओळखले जात. त्यांनी नागपूरचे महापौर पद भूषविले होते. ते एक उत्तम पत्रकार होते. तसेच अतिशय स्पष्ट वक्ते म्हणून ते ओळखले जात होते. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड......

कै.इसाक जमखानावाला यांनी सुरुवातीच्या काळात वैद्यकीय व्यवसाय केला. मुंबईतील अंजुमन-ए-इस्लाम शिक्षण मंडळाचे ते अध्यक्ष होते. नगर विकास विभागाचे राज्य मंत्री असताना त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काम केले होते. त्यांच्या निधनाबद्दल मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.पांडुरंग दादासाहेब पाटील यांचा जन्म 1 जुलै, 1918 रोजी सातारा जिल्ह्यातील कराड येथे झाला. मघाशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, पांडुरंग पाटील यांना संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र पी.डी.पाटील म्हणून ओळखत होता. मी तर असे म्हणेन की, फक्त पश्चिम महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण राज्य त्यांना पी.डी.पाटील म्हणून ओळखत होता. पी.डी.पाटील यांनी कराड नगरपरिषदेचे सतत 42 वर्षे नगराध्यक्ष पद भूषविले होते. सर्वाधिककाळ नगराध्यक्ष पद भूषविण्याचा जागतिक विक्रम केल्याबद्दल "गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड"मध्ये त्यांची नोंद घेण्यात आली होती. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे दिनांक 17 सप्टेंबर, 2008 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.बाजीराव नाना पाटील यांचा जन्म दिनांक 1914 रोजी जळगाव जिल्ह्यात बलवाडी येथे झाला. त्यांनी जळगाव जिल्ह्यात सहकाराचे जाळे विणले. बलवाडी ग्रामपंचायतीचे सलग 25 वर्षे ते सरपंच होते. 1968 मध्ये ते विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे दिनांक 10 ऑक्टोबर, 20078 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.रमेश निकोसे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

-------------

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते श्री. छगन भुजबळ यांनी या ठिकाणी श्री.विश्वनाथ प्रतापसिंह, भारताचे माजी पंतप्रधान, श्री.सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उपसभापती, तसेच सर्वश्री त्रिंबकराव गोपाळराव देशमुख, महमद इसाक जमखानवाला, माजी वि.प.स. व मंत्री., सर्वश्री पांडुरंग दादासाहेब पाटील, रमेश मोतीरामजी निकोसे व बाजीराव नाना पाटील माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. त्याबद्दल मी माझ्या भावना या ठिकाणी व्यक्त करतो.

भारताचे माजी पंतप्रधान कै. विश्वनाथ प्रताप सिंह हे खऱ्या अर्थाने मंडल आयोगाचे जनक होते. पुरोगामी भारताच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारक निर्णय त्यांना घ्यावा लागला होता व त्या निर्णयाच्या अनुषंगाने मंडल आयोगाच्या माध्यमातून त्यांनी एक धाडसी पाऊल टाकले होते. त्यावेळी त्यांना अनेक प्रकारचे क्लेषही सहन करावे लागले होते. खऱ्या अर्थाने त्यांनी आपल्या कार्याची सुरूवात कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापासून केली होती. 1957 सालापासून त्यांनी विनोबा भावे यांच्या भूदान यज्ञाच्या माध्यमातून आपल्या कार्यास सुरुवातच केली असे नाही तर आपली संपूर्ण जमीन या भूदान चळवळीला दान केली होती. अलीकडच्या काळातील ते एक विशेष मोठे दान म्हणावे लागेल, त्याग म्हणावे लागेल. उत्तर प्रदेशमध्ये मुख्यमंत्री असताना चंबळ खोऱ्यातील दरोडेखोरांना रोखण्याचासुध्दा त्यांनी प्रयत्न केला होता. चंबळ खोऱ्यातील दरोडेखोरांना रोखत असतांना त्यांच्या बंधूनासुध्दा त्याच दरोडेखोराकडून मूत्य झाला होता. त्यावेळी ही दरोडेखोरी कितीही रोखण्याचा प्रयत्न केला तरी आपल्याला त्यात तेवढे यश आले नाही असे समजून त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामासुध्दा दिला होता. केन्द्रीय पातळीवर अनेक विभागाच्या मंत्रीपदी त्यांनी अनेक वर्षे काम केले होते. एक अत्यंत हजरजबाबी, ध्येयवादी, कणखरवृत्तीचा नेता म्हणून संपूर्ण देश विश्वनाथ प्रताप सिंह यांच्याकडे पाहातो. अशा या राष्ट्रीय नेत्याचे दु:खद निधन 27 नोव्हेंबर 2008 रोजी झाले.

कै. सूर्यभान रघुनाथ वहाडणे, माजी उपसभापती यांचे दु:खद निधन झाले आहे. त्यांचा जन्म अहमदनगर जिल्हयात 1930 साली झाला होता. 1963 साली स्वयंसेवक संघाचे कार्यवाह म्हणून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली होती. अत्यंत कष्ट करणे, पक्षाशी एकनिष्ठ राहणे, अत्यंत साधी राहणी असे त्यांचे वैशिष्ट्य होते. विधान परिषदचे उपसभापती म्हणून ते काम करीत

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

असतांना त्यांचा व माझा जवळून परिचय झाला होता. एक ध्येयनिष्ठ विचारांचा कार्यकर्ता म्हणून त्यांच्या पक्षात त्यांचे स्थान होते. त्याचबरोबर अन्य सहकारी मित्रांमध्येसुध्दा त्यांचे विशिष्ट असे स्थान निर्माण झाले होते. कै. वहाडणे यांचे दु:खद निधन 2 नोव्हेंबर, 2008 रोजी झाले होते.

कै.त्रिंबकराव गोपाळराव देशमुख यांचे दु:खद निधन झाले असून ......

नंतर श्री. सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 14:55

**सभापती** ....

अत्यंत परखड, ध्येय्यनिष्ठ, कोणत्याही संकटाला न डरणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. विदर्भाच्या विकासाचा त्यांना ध्यास लागलेला होता आणि त्यासाठी त्यांनी स्वतंत्र विदर्भाची चळवळ त्यांनी आपल्या खांद्यावर घेतली हाती. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य साहित्य तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात व्यतित केले होते. काही काळ ते राज्यसभेचे सदस्य देखील हाते. तसेच या विधान परिषदेचेही ते सदस्य होते. 1988 मध्ये तर त्यांनी विधान सभेमध्ये देखील सदस्य म्हणून काम केले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये देखील त्यांनी चांगल्या प्रकारे काम केले आहे. विदर्भाच्या अशा या कणखर नेत्याचे दु:खद निधन 4 डिसेंबर 2008 रोजी झाले.

मरहूम महम्मद इसाक जमखानावाला हे एक अत्यंत ध्येय्यनिष्ठ, अभ्यासू, शांत परंतु आपल्या विचारांशी निश्चित असणारे तसेच कुशाग्र बुद्धिचे असे व्यक्तिमत्त्व होते. ते मुंबईतील नागपाडा मतदारसंघातून 1978 मध्ये प्रथमत: विधानसभेवर निवडून आले हाते. त्यानंतर 1988 मध्ये ते विधान परिषदेवर निर्वाचित झाल होते. 1977 ते 1980 या काळात त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळामध्येही काम केलेले होते. 1988 ते 1990 या काळात त्यांनी नगरविकास खात्याचे पूर्ण मंत्री म्हणून काम केलेले होते. अशा या एका ज्येष्ठ समाजसेवकाचे निधन 31 ऑगस्ट 2008 रोजी झाले.

स्व. पांडुरंग दादासाहेब म्हणजेच पी.डी.पाटील हे एक आगळे वेगळे असे व्यक्तिमत्त्व होते. स्व. यशवंतराव चव्हाण यांचे ते एकनिष्ठ सहकारी होते तसेच पश्चिम महाराष्ट्रामध्ये एक अत्यंत स्पष्ट बोलणारे आणि परखड विचारांचे व्यक्तिमत्त्व म्हणून आम्ही त्यांना सातत्याने पाहत होतो व मी तर त्यांचे नेहमी मार्गदर्शनदेखील घेत होतो. कराड नगरपालिकेचे 42 वर्षे नगराध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलले आहे. सह्याद्री सहकारी संस्थेचे ते संस्थापक-अध्यक्ष म्हणून देखील त्यांनी काम केले आहे. एकूणच सहकारी चळवळीमध्ये त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीचे काम केले आहे. 1960 मध्ये प्रथमत: ते या विधान परिषदेवर सदस्य म्हणून आले होते आणि त्यानंतर 1963, 1980 व 1995 असे तीन वळा कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले होते. अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे 17 सप्टेंबर 2008 रोजी दु:खद निधन झाले.

स्व. रमेश मोतीरामजी निकोस यांच्याबाबत सांगावयाचे तर या सदनात त्यांना ज्या दिवशी निरोप दिला त्या दिवशी त्यांनी केलेले भाषण अतिशय हृदयस्पर्शी होते. ते डॉ.बाबासाहेब

..... एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

आंबेडकर यांचे निस्सिम भक्त होते आणि मागासवर्गीय समाजाच्या उद्धारासाठी, उन्नतीसाठी ते नेहमीच अत्यंत तळमळीने काम करीत असत. सर्वसामान्य माणसासाठी रात्रंदिवस राबणारा एक कार्यकर्ता म्हणून देखील त्यांची ओळख होती. असा हा तळमळीचा कार्यकर्ता, नेता एवढ्या अनपेक्षितरित्या आपल्यातून जाईल असे कोणालाही वाटल नव्हते. मध्यंतरी काही दिवसांपूर्वी मला ते भेटले हाते आणि आता माझी प्रकृती ठीक आहे अशा भावना देखील त्यांनी माझ्या समोर व्यक्त केल्या होत्या. पण दुर्दैवाने 20 सप्टेंबर 2008 रोजी त्यांचे दु:खद निधन झाले.

( यानंतर श्री.सरफरे ... वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

स्वर्गीय बाजीराव नाना पाटील यांची व माझी व्यक्तिगत ओळख नव्हती. ते या सदनामध्ये 1968 मध्ये निवडून आले होते. त्यांचे निधन 10 ऑक्टोबर 2008 रोजी झाले. या सर्व दिवंगत नेत्यांना मी माझी आदरांजली वाहतो.

आता सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

मुंबई शहरात अतिरेक्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात व गोळीबारात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी, राष्ट्रीय सुरक्षा दलाचे जवान आणि या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या अनेक निरपराध व्यक्तिंच्या दु:खद निधनाबद्दल तसेच भारताचे माजी पंतप्रधान श्री. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सदस्यांनी काढलेल्या उद्गारासंबंधी**

**माननीय सभापतींनी दिलेला निर्णय**

**सभापती** : मघाशी या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या एका बाबीवर मला निर्णय ध्यावयाचा होता. तो निर्णय मी आता या ठिकाणी देत आहे. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी पहिल्या शोकप्रस्तावावर बोलत असतांना जे भाषण केले, वक्तव्य केले त्यामधील काही वाक्ये मी कामकाजामधून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. शहीद हेमंत करकरे यांच्याबद्दल अत्यंत वाईट उद्‌गार काढले गेले होते. त्यांना व्हिलन ठरविले गेले, त्यांच्या बायका-मुलांची धिंड काढण्याची भाषा व्यक्त केली गेली. त्यासंबंधीची आज चर्चा करण्याची ही वेळ नाही. परंतु या निमित्ताने या वीरांना अभिवादन करतांना आमची चूक झाली एवढे कुणीतरी म्हणावे अशी अपेक्षा आहे. तेव्हा शहीद हेमंत करकरे व त्यांच्या कुटुंबियांविषयी उद्‌धृत केलेली वाक्ये मी कामकाजातून काढून टाकीत आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 16 डिसेंबर 2008 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 3 वाजून 02 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 16.12.2008 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही